नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट,नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २२१ * * अमरावती * शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## फरार विजय मल्ल्या भारतात परतणार?



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
भारताचा फरार आर्थिक गुन्हेगार विजय मल्ल्याची थेट मुंबई उच्च न्यायालयाने कानउघडणी केली आहे. याचसोबत भारतात परतण्यासाठी विजय मल्ल्याला शेवटची संधी देण्यात आली आहे.

देशातील तसेच यूनायटेड किंगडममधील न्यायालयीन प्रक्रियेपासून दूर राहता येणार नसल्याचेही मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. आता विजय मल्ल्याला शेवटची संधी देत त्याने भारतात परतणार की नाही हे स्पष्ट करावे अन्यथा त्यांची याचिका ऐकली जाणार नसल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे.

## विदर्भ साहित्य संघाचा साहित्य आखाडा

आग्रह लेख खरीखरी.. श्रीकृष्ण चांडक



महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा, संभाजीनगर आणि पुणे मुंबई या चार ठिकाणी मराठी साहित्यिकांच्या चार संस्था आहेत. १४ जानेवारी १९२३ रोजी अमरावती येथे विदर्भ साहित्य संघाची स्थापना झाली त्यानंतर १९५० मध्ये तिचे मुख्य कार्यालय नागपूरला हलवण्यात आले या सर्वाचे श्रेय अण्णासाहेब खापर्डे यांना जाते. एवढा जुना इतिहास असलेल्या विदर्भ साहित्य संघाची यंदा जवळजवळ दीड तपानंतर निवडणूक होत आहे. इथे मतदार म्हणून संघाच्या यादीप्रमाणे साडेसात हजारांपेक्षा जास्त सदस्य आहेत. विदर्भ साहित्य संघाच्या कारभाराची मोठीच गंमत आहे. या साडेसात हजार सदस्यांना आतापर्यंत कधीच मतदान करावे लागले नाही कारण आजवर निवडणुकच झाली नाही. नागपुरातील महनीय व्यक्तींना विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष करण्यात येत होते आणि तेच अध्यक्ष आपली कार्यकारणी जाहीर करत होते. यामध्ये गजानन त्र्यंबक माडखोलकर, कवी अनिल, मधुकर आष्टीकर, सुरेश द्वादशीवार, ना. रा शेंडे, राम शेवाळकर आणि गेल्या काही वर्षापासून प्रदीप दाते हे अध्यक्ष होते. त्याआधी अनेक वर्ष मनोहर म्हैसाळकर यांनी आपली अध्यक्षपदाची कारकीर्द दीर्घकाळ उपभोगली. विदर्भ साहित्य संघाची वास्तू साहित्यिकांसाठी चर्चेचे, बैठकीचे मध्यवर्ती ठिकाण होते. त्याच जागेत नागपूरची शान असलेले एकमात्र धनवटे रंगमंदिर होते आणि सुसज्ज वाचनालय सुद्धा होते. वेगवेगळ्या कार्यक्रमांकरिता तिथे दोन-तीन छोटी मोठी सभागृहे होती. कार्यालयाच्या बाहेर साहित्यिक, कलाकार आणि साहित्यप्रेमींच्या मैफिली झडत असत. विदर्भाच्या साहित्य विश्वात या स्थानाचा गौरवपूर्ण उल्लेख होत होता. पण काही वर्षांपूर्वी त्या रम्य साहित्य विश्वाला ग्रहण लागले, ग्रहण लागल्यावर ते बाधले आणि विदर्भ साहित्य संघातून नंतर साहित्य बाद झाले. त्यानंतर खाली दुकाने उभी राहिली, मग वास्तु दोषपूर्ण झाली आणि हा साहित्याचा वृक्ष अक्षरशा कोलमडला. आता वेगवेगळ्या प्रकारे विषाक्त वातावरण तयार करून काही मंडळी विनाकारण द्वेषाचे राजकारण करीत आहेत. जिथे साहित्यकारण व्हावे तिथे साहित्याचा अंश नाही. कुठेतरी वरच्या मजल्यावर विदर्भ साहित्य संघाचे दीनवाणे कार्यालय आहे अशा या महान संस्थेला वाचवण्यासाठी एका पॅनेलचा उदय झालेला आहे. जिथे साहित्यकारण शिल्लकच नाही आणि ज्या बुडालेल्या साहित्याच्या नावेला छिद्र पडलेले आहे त्याला म्हणे हे वाचवणार आहेत. या पॅनेलच्या अपप्रचारामुळे जे वातावरण निर्माण झाले आहे ते बघता आतापर्यंतच्या नावलौकिकाला छेद देणारी दिशा स्पष्ट दिसते. सर्वप्रथम श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या अध्यक्षतेखालील पॅनलने आपली नावे जाहीर केली त्यानंतर मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉक्टर रवींद्र शोभणे यांनी आपले पॅनेल जाहीर केले. विदर्भाच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक कार्यात ज्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते व ज्यांना महाराष्ट्रभर विदर्भाचे सांस्कृतिक दूत म्हणून ओळखले जाते त्या डॉक्टर गिरीश गांधी यांनीही आपले पॅनेल उभे केले आहे. त्यांच्या पॅनेल मध्ये अरुणा सबाणे, शुभदा फडणवीस, बाळ कुळकर्णी, विष्णू मनोहर, डॉक्टर पराग घोंगे, चंद्रकांत लाखे, लखनसिंह कटरे, श्याम धोंड यासारखी नामवंत मंडळी आहेत. प्रदीप दाते यांच्या पॅनलमध्ये विलास मानेवार, डॉक्टर राजेंद्र दोडके, श्रीपाद अपराजित, अनिल गडेकर सुनील शिंदखेडा, डॉक्टर सतीश तराळ, डॉक्टर राजेंद्र मुंडे यासारखी मंडळी आहेत. तर श्रीपाद जोशींच्या पॅनेलमध्ये संजय इंगळे तिगावकर, विनोद देशमुख, विलास देशपांडे, डॉक्टर शरद निंबाळकर, प्रमोद भुसारी, राजेश राजोरे वगैरे मंडळी आहेत. त्यासोबतच डॉ. रंजन दारव्हेकर जे नाटककार पुरुषोत्तम दारव्हेकर मास्तरांचे पुत्र आहेत त्यांनी पॅनल वगैरेची घोषणा केली नाही कारण त्यांचे म्हणणे असे आहे की, जे ८८ उमेदवार सदस्य पदासाठी उभे आहेत. त्यापैकी सर्वाधिक मते मिळवणाऱ्या बावीस सदस्यांचा कार्यकारणी समावेश होईल, म्हणून पॅनल वगैरेची गरजच नाही. ही सर्व मंडळी सध्या प्रचारात मग्न आहेत. सोशल मीडियावर आतापर्यंत बऱ्याच उखाळ्या पाखळ्या काढून झाल्या आहेत. प्रत्येकाचा अजेंडाही जाहीर झालेला आहे. यापैकी अनेक महानुभव यापूर्वीही विदर्भ साहित्य संघाचे कर्तेसवर्ते होते, त्यांच्याच कार्यकाळात पडझड झाली आणि तेच आता वाचवा वाचवा अशी भूमिका घेत आहेत. या सर्वांचाच रोख आणि उद्देश विदर्भ साहित्य संघाला पुन्हा जिवंत करण्यासाठी प्रयत्न करण्यावर आहे. यापैकी संस्था उभारणी आणि साहित्यिकांना मंच उपलब्ध करण्याचा अनुभव असलेले गिरीश गांधी यांचाही सकारात्मक प्रचार सुरू आहे. जे जे सदस्य निवडून येतील त्यांच्या अनुभवाचा लाभ या संस्थेला व्हावा, येथील मरगळ दूर व्हावी यासाठी सर्वच दंड थोपटून उभे आहेत. एकूणच विदर्भ साहित्य संघात साहित्यिकांचा निवडणूक आखाडा तयार झालेला आहे. यामध्ये कोण जिंकेल ते आज सांगता येत नाही. तरीही प्रत्यक्षात संस्था उभारणीचा आणि कामाचा अनुभव असलेल्यांनाच साहित्यिकांनी व या संस्थेच्या सदस्यांनी म्हणजेच मतदारांनी मते द्यावी आणि विदर्भ साहित्य संघाचा भविष्यकाळ उज्वल करावा, एवढेच आमचे म्हणणे आहे.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## देशव्यापी बंदला संमिश्र प्रतिसाद




■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
कामगार कायद्याच्या विरोधात गुरूवार १२ फेब्रुवारी रोजी पुकारण्यात आलेल्या भारत बंदला देशभरात संमिश्र प्रतिसाद मिळाला .शेतकरी संघटना आणि १० केंद्रीय कामगार संघटनांच्या संयुक्त मंचाने हा संप पुकारला होता.

भारत आणि अमेरिकेदरम्यान झालेल्या व्यापार कराराविरोधात कामगार संघटना, शेतकरी संघटना आणि कर्मचारी संघटनांनी गुरूवारी देशव्यापी संपाची हाक दिली होती . अनेक ठिकाणी कंत्राटी कर्मचारी संपावर गेलेत, तर नियमित कर्मचारी सेवा पुरवत होते. सरकारी विभागांमधील कामकाज प्रभावित झाल्याचे दिसून आले . बहुतेक ठिकाणी राष्ट्रीयकृत व खासगी बँका सुरू होत्या.

ऑल इंडिया पॉवर इंजिनियर्स फेडरेशनचे अध्यक्ष शैलेंद्र दुबे यांनी सांगितले की, देशभरातील सुमारे २७ लाख वीज कर्मचारी आणि अभियंते संपावर होते.

संयुक्त किसान मोर्चाने कामगार संघटनांच्या मागण्यांना पाठिंबा दिला होता . कृषी मजूर संघटनांचा संयुक्त मोर्चा देखील संपात सहभागी झाला होता. मनरेगा पूर्ववत करणे, विकसित भारत रोजगार आणि उपजीविका मिशन (ग्रामीण) हमी कायदा, २०२५ मागे घेणे, चार कामगार संहिता रद्द करणे, मसुदा बियाणे विधेयक आणि वीज सुधारणा विधेयक मागे घेणे यांसारख्या मागण्यांसाठी संप पुकारला गेला. अनेक शहरांमध्ये शासकीय कामकाज सुरळीत असल्याचेही दिसून आले.

## चंद्रपुरात फाटले, परभणीत जुळले

### शिवसेना उबाठाचा मुस्लिम महापौर आणि काँग्रेसचा हिंदू उपमहापौर

■ वृत्तसंस्था, परभणी, दि. १२ :
परभणी महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने मोठे यश मिळवले आहे.

शिवसेनेचे उमेदवार सय्यद इक्बाल यांनी भाजपच्या तिरुमला खिल्लारे यांचा १३ मतांनी पराभव केला आणि ते परभणीचे नवीन महापौर बनले आहेत. या विजयामुळे परभणी महापालिकेवर आता शिवसेनेचा भगवा फडकला आहे.

या निवडणुकीत काँग्रेसची भूमिका सर्वात महत्त्वाची ठरली. काँग्रेसने स्वतःचा उमेदवार उभा न करता शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शिवसेनेचे पारडे जड झाले. मतदानाच्या वेळी सय्यद इक्बाल यांना एकूण ३९ मते मिळाली, तर भाजपच्या उमेदवाराला २६ मते मिळाली. भाजपला पराभूत करण्यासाठी शिवसेना आणि काँग्रेसचे नगरसेवक एकत्र एकाच बसमधून मतदानासाठी आले होते, ज्यावरून त्यांची एकजूट दिसून आली.

दुसरीकडे, उपमहापौर पदासाठी झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचे गणेश देशमुख विजयी झाले आहेत. या विजयानंतर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी परभणीत मोठा जल्लोष केला. भाजपला रोखण्यासाठी महाविकास आघाडीने केलेली ही रणनीती यशस्वी ठरल्याचे मानले जात आहे.

शिवसेना आणि काँग्रेसचे एकूण ३७ नगरसेवक एकत्रित आणि एकाच बसमधून सभागृहाकडे गेले, ज्यातून सत्ताधारी आघाडीतील एकजूट ठळकपणे दिसून आली.

परभणी महानगरपालिकेच्या एकूण ६५ जागांपैकी शिवसेना ठाकरे गटाचे २५, काँग्रेसचे १२, भाजपचे १२, राष्ट्रवादी काँग्रेसचे ११, जनसुराज्य शक्तीचे ३, यशवंत सेनेचा १ आणि इतर १ सदस्य आहेत.

चंद्रपूर मनपात शिवसेना उबाठाने काँग्रेसची साथ सोडून भाजपाशी जवळीक केली असली तरी परभणीत आघाडी कायम राखली गेली.

## काँग्रेस पराभवाची पहिली बैठक पुगलियांच्या घरीच

### मुनगंटीवारांचा गौप्यस्फोट



■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर / नागपूर, दि. १२ :
काँग्रेस महापौर व उपमहापौर पदाच्या उमेदवाराचा पराभव करण्यासाठी पहिली बैठक विदर्भ किसान मजदूर काँग्रेसचे युवा नेते राहुल पुगलिया यांच्या निवासस्थानीच पार पडल्याचा गौप्यस्फोट माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केला. त्यामुळे खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिलेला महापौर पदाचा उमेदवार पाडण्यासाठी काँग्रेसचे जिल्ह्यातील आणखी काही नेते सहभागी होते अशीही माहिती समोर आली आहे.

काँग्रेस व मित्रपक्षाचे ३० नगरसेवक निवडून आले. त्यामुळे काँग्रेस महापौर पदाची निवडणूक सहज जिंकणार अशीच स्थिती होती. मात्र खासदार प्रतिभा धानोरकर व विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांच्यातील श्रेयवाद, महापौर व गटनेता यासाठी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत टोकाची भांडणे झाली.

या जिल्ह्यातील शिवसेना ठाकरे, शिंदे तसेच राष्ट्रवादी व इतर पक्षातील तरूण नेत्यांसोबत विदर्भ किसान काँग्रेसचे युवा नेते राहुल पुगलिया यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. मुनगंटीवार यांनी पुगलिया यांच्या माध्यमातून त्यांच्याच निवासस्थानी भाजपचा महापौर बसविण्याची आणि काँग्रेसला पराभूत करण्याची पहिली बैठक लावली. राहुल पुगलिया यांच्या निवास्थानी झालेल्या बैठकीनंतर एकेक सुत्र जुळत गेली आणि भाजपला शिवसेना, अपक्ष आणि इतर पक्षाचा पाठिंबा मिळत गेला.

आज मुनगंटीवार यांनी माध्यमांसमोर येत पुगलिया यांच्याच घरी काँग्रेसच्या पराभवाची पहिली बैठक पार पडली असा गौप्यस्फोट केला. त्यामुळे भाजपाचा महापौर बसवण्यात आणि काँग्रेसशी दगाफटका करण्यात काँग्रेस नेत्यांचाच हात होता, हे उघड झाले आहे . काँग्रेसच्या पराभवाचे दुःख मतदारांसोबत अनेकांना असले तरी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या अहंकाराचा पराभव झाला याचा आनंदनही अनेकांनी व्यक्त केला आहे.

## मोदींचे आज नवीन कार्यालयात स्थलांतरण



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी १३ फेब्रुवारी रोजी नवीन पंतप्रधान कार्यालय 'सेवा तीर्थ' मध्ये स्थलांतरित होतील.

ते दुपारी सुमारे १:३० वाजता 'सेवा तीर्थ' इमारत संकुलाच्या नावाचे अनावरण करतील. त्यानंतर सायंकाळी सुमारे ६वाजता सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन-१ आणि २ चे उद्घाटन करतील. पंतप्रधान एका सार्वजनिक कार्यक्रमाला संबोधितही करतील. सध्या पंतप्रधान कार्यालय नवी दिल्ली येथील सचिवालय इमारतीच्या दक्षिण ब्लॉकमध्ये आहे. येथे शुक्रवारी पंतप्रधानांच्या कामकाजाचा शेवटचा दिवस असेल. पंतप्रधान मोदी येथे केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विशेष बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील.

मंत्रिमंडळाची ही बैठक शुक्रवार सायंकाळी ४ वाजता निश्चित केली आहे. ब्रिटिशकालीन सचिवालय इमारतीतील ही शेवटची बैठक असेल. याची रचना १९०० च्या सुरुवातीच्या दशकात ब्रिटिश वास्तुविशारद हर्बर्ट बेकर यांनी ब्रिटिश शासनाच्या गरजांनुसार केली होती. यासोबतच, नॉर्थ आणि साउथ ब्लॉक मधून सरकारी विभागांचा कार्यकाळ संपेल. या दोन्ही इमारतींना देशाच्या सत्तेचे केंद्र मानले जात होते. कर्तव्य भवन-१ आणि २ मध्ये केंद्र सरकारच्या मंत्रालयांची कार्यालये असतील.

## ११४ राफेल जेट खरेदीच्या प्रस्तावाला अखेर मंजुरी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :
भारताच्या संरक्षण अधिग्रहण परिषदेने गुरुवारी फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमानांच्या खरेदी कराराला मंजुरी दिली. तसेच, अमेरिकेकडून ६ पी ८ आय विमाने खरेदी करण्याच्या प्रस्तावालाही हिरवा कंदील मिळाला.



करार पूर्ण झाल्यावर वायुसेनेच्या ताफ्यात सुमारे १५० राफेल लढाऊ विमाने असतील. तर, नौदल २६ कॅरियर-कंपॅटिबल राफेल विमानांचा समावेश करेल. मीडिया रिपोर्ट्सनुसार, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील ३.२५ लाख कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. हा प्रस्ताव आता मंजुरीसाठी कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीकडे पाठवला जाईल.

या प्रस्तावाला १६ जानेवारी रोजी संरक्षण खरेदी मंडळाकडून मंजुरी मिळाली होती. आता अधिग्रहण प्रक्रिया पुढे जाईल. संरक्षण मंत्रालयाच्या मते, नवीन राफेल विमानांच्या खरेदीमुळे हवाई संरक्षण आणि सीमावर्ती भागात तैनातीची क्षमता मजबूत होईल.

## अजितदादा पवार मागासवर्गीय सक्षमीकरण अभियान राबवणार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
अजित पवार यांची शिव,शाहू,फुले, आंबेडकर विचारधारा पुढे नेण्यासाठी राज्यभर अजितदादा पवार मागासवर्गीय सक्षमीकरण अभियान राबविण्या एकमताने निर्धार करण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सामाजिक न्याय विभाग सेलकडुन विधानभवन येथे पार पडलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीत हा निर्णय झाला.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवणे हे अजितदादा पवार यांचे ध्येय पुढे नेण्यासाठी मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, कोकण अशी राज्यात सहा विभागांची आखाणी करण्यात येणार आहे. यासाठी सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे.या नव्या अभियानामुळे पक्षाला मजबूती देण्यास मदत होईल असा विश्वास यावेळी उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला.

## टँकर माफिया फ्री मुंबईचा संकल्प

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
महापौरपद स्वीकारल्यानंतर रितू तावडे यांनी सहा पानी भाषणातून शहरासाठीचा व्यापक आराखडा मांडला.



दरवर्षी होणाऱ्या पाणीपट्टीतील ८ टक्के दरवाढीला स्थगिती देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे जाहीर करत त्यांनी मुंबईकरांना मोठा दिलासा दिला.

पाणी दर स्थिर ठेवण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली जातील. त्याचबरोबर टँकर माफियांची मक्तेदारी संपवण्यासाठी टँकर माफिया फ्री मुंबई, हे धोरण राबवले जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. महायुतीच्या विकसित मुंबई, सुरक्षित मुंबई, या वचनाशी आपण बांधील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पाणीपुरवठ्याच्या दीर्घकालीन प्रश्नांवर ठोस उपाययोजना करून विश्वासार्ह सेवा देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## घातपात असेल तर सिद्ध होईल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
हा घातपात असेल तर ते सिद्ध होईल आणि सिद्ध झाले तर दोषींना शिक्षा मिळेल. तसेच अजित पवारांच्या अपघातासंबधित प्रश्न उपस्थित केले जात असतील तर त्याचे निराकरण देखील व्हायला हवे, अशी प्रतिक्रिया अभिनेते नाना पाटेकर यांनी दिली आहे.



रोहित पवारांनी उपस्थित केलेल्या शंकांवर प्रश्न विचारला असता, ते म्हणाले, रोहित पवारांनी काकांना गमावले आहे. त्यांच्या मनात जे काही प्रश्न असतील ते त्यांनी उपस्थित केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची भेट घेतल्यानंतर नाना पाटेकरांनी माध्यमांशी संवाद साधला.

नाना पाटेकर म्हणाले, रोहित पवारांनी काकांना गमावले आहे. त्यांच्या मनात जे काही प्रश्न असतील ते त्यांनी उपस्थित केले. आणि हा घातपात असेल तर ते सिद्ध होईल आणि सिद्ध झाले तर दोषींना शिक्षा मिळेल. तसेच अजित पवारांच्या अपघातासंदर्भात प्रश्न उपस्थित केले जात असतील तर त्याचे निराकरण देखील व्हायला हवे. अजित पवार माझ्या लहान भावासारखे होते, चांगले मित्र होते. मी त्यांना नेहमी मिस करेन. तसेच सुनेत्रा पवार यांचे दुःख इतरांपेक्षा वेगळे आहे. ते त्यांनाच सहन करावे लागेल, अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या.

## स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून वेगाने परिवर्तन

### टाटा ट्रस्ट सोबत १२ व नाम फाउंडेशन सोबत एक सामंजस्य करार



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
महाराष्ट्र विविध क्षेत्रांसह देशाच्या प्रगतीमध्ये वेगळा ठसा उमटवीत आहे. राज्याच्या प्रगतीचा वेग असाच कायम ठेवून राज्य शासनाच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे वेगाने परिवर्तन होईल,असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत करण्यात आलेल्या करारावेळी व्यक्त केला. टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत झालेल्या करारामळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे उपस्थित होत्या.

फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारणे याला शासनाचे प्राधान्य आहे. या भागीदारींमुळे विविध कल्याणकारी शासकीय योजना अधिक लोकोपयोगी होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत आहे. टाटा ट्रस्टचे सहकार्याने विविध विभागांच्या माध्यमातून सकारात्मक प्रभाव पाडण्यात यशस्वी होऊ.

समाजातील सर्व घटकात उत्पन्न वाढून जगण्याचा स्तर उंचावण्यास यामुळे निश्चितच मदत होईल. दुर्धर आजारांवर महागड्या उपचार पद्धतीमुळे सामान्य नागरिकांना मयार्दा येतात मात्र राज्यात यापुढे उपचाराविना कुणीही मृत्यू पावणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करण्यात येत आहे. टाटांची मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मोठी मदत असून यामुळे आपण गरजू रुग्णांना निश्चित स्वरूपाची मदत देऊ शकतो.

नाम फाउंडेशन राज्यात जलसंधारणामध्ये मोठे काम करीत आहे. नाम फाउंडेशनच्या सहभागाने विदर्भ व मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेल्या भागात जलसंधारणाचे मोठे काम झाले. यासाठी टाटा ट्रस्टचीही मदत झाली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष नोएल टाटा म्हणाले, महाराष्ट्र शासनाशी भागीदारी करून आरोग्य, शिक्षण, पोषण, उपजीविका, पाणी आणि स्वच्छता कार्यक्रमांमध्ये सुसूत्रता आणणार आहे. सर्व सामन्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न राहणार आहे.

शासनाचे विविध विभाग आणि समुदायांसोबत सकारात्मक परिणाम आणण्याचा हेतू असणार आहे. शासन आणि टाटा ट्रस्ट्स यांनी आज राज्याच्या एकात्मिक विकासाला पाठबळ देण्यासाठी सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करून धोरणात्मक भागीदारी अधिकृत केली आहे.

नाम फाउंडेशनचे नाना पाटेकर ▶▶ पान ८ वर

## राष्ट्रवादींचे विलीनीकरण होणार नाहीच



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
आता दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण होणार नाहीच, असे सांगत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी याविषयी १५ दिवसांपूर्वी सुरू झालेल्या चर्चेवर बुधवारी पडदा पाडला. दिल्लीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी मोदींची भेट घेतली. त्या वेळी तटकरेही उपस्थित होते.

भेटीनंतर पक्षाची भूमिका स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, आम्ही आमची ओळख जपूनच सत्तेत सहभागी आहोत. तीन महिन्यांपूर्वी अजित पवारांनी विलीनीकरणाच्या हालचाली सुरू केल्या होत्या. खुद्द शरद पवारांनीही राष्ट्रवादी एकत्र येण्याची अजित पवारांची अंतिम इच्छा पूर्ण झालीच पाहिजे, असे म्हटले होते. दोन्ही पक्ष एकत्र येऊन सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होणार, अशीही चर्चा शरद पवार गटाकडून सुरू होती.

तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ विलीनीकरणास विरोध करत असल्याचाही आरोप नुकताच झाला. दरम्यान, तटकरेंनी भूमिका स्पष्ट केल्यावर १७ फेब्रुवारी रोजी मुंबईत शरद पवारांनी त्यांच्या पक्षाच्या आमदार, पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे.

नवी दिल्लीत पत्रकारांशी संवाद साधताना तटकरे म्हणाले की, २०१४ आणि २०१९ पासूनच भाजपसोबत सत्तेत असावे ही अजितदादांची अधिकृत भूमिका होती. त्यानुसार शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या मूळ विचारधारेसह आमचा एनडीएतील सहभाग कायम आहे. सुनेत्रा पवारांची उपमुख्यमंत्रिपदी निवड कोणत्याही दबावाखाली नसून पूर्णतः पक्षीय सहमतीनेच झाली आहे. सुनेत्रा पवारांनी अजून खासदारकीचा राजीनामा दिलेला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## नामिबियाला २१० धावांचे लक्ष्य

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२
टी-२० विश्वचषकाच्या १८ व्या सामन्यात भारताने नामिबियाला २१० धावांचे लक्ष्य दिले आहे.

दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात नामिबियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघाने २० षटकांत ९ गडी बाद २०९ धावा केल्या. शेवटच्या ४ धावा करताना संघाने ५ गडी गमावले. इशान किशन (२४ चेंडूत ६१ धावा) आणि संजू सॅमसन हार्दिक पंड्या (२८ चेंडूत ५२ धावा) यांनी अर्धशतकीय खेळी केली. तिलक वर्मा यांनी २५, शिवम दुबे यांनी २३ धावा आणि संजू सॅमसन यांनी २२ धावा केल्या.

नामिबियाचा कर्णधार जेरार्ड इरास्मसने ४ बळी घेतले. बेन शिकोंगो, जेजे स्मित आणि बर्नार्ड स्कॉल्झ यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. अर्शदीप सिंगने पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात १७ धावा दिल्या. ७ व्या षटकात नामिबियाचा संघ ६५ धावांवर पोहचला होता.

## दादा एकटे पडल्यासारखे दिसत होते



■ मुंबई : नरेश अरोरा यांना कॉन्ट्रॅक्ट मिळायलाच हवा, अशी काहींची भूमिका होती. मात्र, अजित दादांची कॉन्ट्रॅक्ट संदर्भात वेगळी भूमिका होती, असा दावा रोहित पवार यांनी केला आहे. मी कोणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले नसल्याचे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. तटकरे आरोरांच्या कॉन्ट्रॅक्ट साठी चर्चेला गेल्याचा अंदाज असल्याचे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. मात्र या सर्व गोष्टींची लवकरात लवकर चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी पुन्हा एकदा केली. दादांना का उशीर झाला? हे मी बोलून दाखवले, दादा गाडीने गेले असते तरी दुर्घटना घडली नसती, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांचा पक्ष हा एनडीए सोबत जाणार होता का? या संदर्भातल्या प्रश्नाला आपण सोमवारी किंवा मंगळवारी मुंबईमध्ये पत्रकार परिषदेत उत्तर देऊन स्पष्ट करेल, असं म्हणत रोहित पवार यांनी या उत्तरावर बोलणे टाळले. आम्हाला सत्तेत जायचे असते तर केव्हाच गलो असतो. मात्र विचारासाठी आम्ही संघर्ष करत आलेलो आहोत, असे देखील रोहित पवार यांनी स्पष्ट केले. मी कुठेही खोटं बोललेलो नसल्याचे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. सोमवारी किंवा मंगळवारी जी पत्रकार परिषद होणार आहे. त्यामुळे काय घडले? कुठे झाले? विरणीकरणावर कोण काय बोलले? या सर्व गोष्टींवर बोलणार असल्याचे रोहित पवार यांनी सांगितलं. गेल्या चार महिन्यापासून दादा एकटे पडल्यासारखे दिसत होते. देशपातळीवरचे आणि राज्यपातळीवरचे लोक त्यांच्यासोबत नव्हते.

## बारावीच्या परीक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट
### केंद्र अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई



■ मुंबई : राज्यात 10 फेब्रुवारीपासून बारावीच्या बोर्ड परीक्षांना सुरुवात झाली असली तरी, पहिल्याच दिवशी 'कॉपीमुक्त' अभियानाचा फज्जा उडाल्याचे समोर आले आहे. काही परीक्षा केंद्रांवर खुद्द अधिकारी आणि पर्यवेक्षकच विद्यार्थ्यांना चक्क कॉपी पुरवत असल्याचा धक्कादायक प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी संबंधित परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्याचे तसेच दोषी पर्यवेक्षक आणि केंद्र अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. बारावीच्या परीक्षा केंद्रांना सीसीटीव्ही आणि इतर मूलभूत सुविधांचे कडक निर्देश देऊनही कॉपीचे प्रकार उघडकीस आल्याने शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी कठोर कारवाईचा पवित्रा घेतला आहे. ज्या केंद्रांवर असे गैरप्रकार घडले आहेत, त्यांची मान्यता तातडीने रद्द करण्यात येणार असून भविष्यात त्यांना परीक्षा केंद्र म्हणून पुन्हा परवानगी देण्यात येणार नाही. केवळ कॉपी बहाद्दर विद्यार्थ्यांवरच नाही, तर या प्रक्रियेत सामील असलेले केंद्र प्रमुख आणि संबंधित पालकांवरही कायदेशीर बडगा उगारला जाणार असून, नियमावलीचे पालन न करणाऱ्या शाळांनाही या कारवाईतून सुटता येणार नाही, असे दादा भुसे यांनी स्पष्टपणे बजावले आहे. राज्यात सध्या बारावीच्या परीक्षा सुरू असून मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली 'कॉपीमुक्त परीक्षा अभियान' प्रभावीपणे राबवण्यासाठी शिक्षण विभाग सज्ज झाला .

## मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढतोय म्हणून माझ्या हत्येचा कट



■ मुंबई : मंगळवेढा तालुक्यातील माचनूर येथे शिवजयंती 2026 च्या कार्यक्रमात मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी अत्यंत गंभीर आरोप करत वातावरण ढवळून काढले. मी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढतोय म्हणून माज्या हत्येचा कट रचला जात आहे. त्यासाठी आपल्याच लोकांचा वापर केला जातोय, सुपाऱ्या दिल्या जात आहेत, असा थेट दावा त्यांनी केला. या वक्तव्यामुळे उपस्थितांमध्ये खळबळ उडाली. जरांगे यांनी सांगितले की, काही जणांकडून त्यांच्या विरोधात मुद्दाम बोलून घेतले जात आहे, तरीही माज्यासोबत मायबाप जनता आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माचनूर आणि मंगळवेढ्यातील त्यांच्या दौऱ्याला मोठा प्रतिसाद मिळाला. 11 फेब्रुवारी रोजी झालेल्या या भेटीत मार्गभर मराठा बांधवांनी स्वागतासाठी गर्दी केली होती. कार्यक्रमात बोलताना त्यांनी समाजाला व्यसनमुक्त राहण्याचा सल्ला दिला. व्यसनापासून दूर राहा आणि शेतात भरपूर काम करा, असे आवाहन करत त्यांनी समाजजीवन आणि कष्टाचे महत्त्व अधोरेखित केले. आरक्षणाची लढाई लढताना समाजाने आपली ताकद संघटितपणे दाखवावी, असे ते म्हणाले. राजकारण केवळ निवडणुकीपुरते करा, नंतर शेतात लक्ष द्या, असा संदेश देत जरांगे यांनी पालकांना मुलांच्या शिक्षणावर भर देण्याचे आवाहन केले.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (१२ फेब्रुवारी) जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक पार पडली. दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतरची ही पहिलीच बैठक होती. सुनेत्रा पवार यांनी मुंबईतून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या बैठकीचे नेतृत्व केले, तर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते.

या बैठकीत प्रामुख्याने मागील आर्थिक वर्षात झालेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला आणि आगामी वर्षासाठीच्या नवीन विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आली. पुणे जिल्ह्याच्या विकासासाठी



जास्तीत जास्त निधी मिळावा, अशी मागणी यावेळी जिल्ह्यातील आमदारांनी केली. मंत्री दत्तात्रय भरणे यांनी बैठकीनंतर माहिती दिली की, अजितदादांनी जो शिस्तबद्ध कारभार आणि वेळेचे पालन करण्याची पद्धत सुरू केली होती, तीच परंपरा कायम राखत ही बैठक वेळेवर सुरू करण्यात आली.

राजकीय घडामोडींबाबत बोलताना दत्तात्रय भरणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणावरही भाष्य केले. सुनेत्रा पवार यांनी नुकताच दिल्ली दौरा करून वरिष्ठ नेत्यांच्या भेटी घेतल्या आहेत, त्यामुळे विलीनीकरणाचा अंतिम निर्णय त्याच घेतील आणि तो सर्वांना मान्य असेल, असे भरणे यांनी स्पष्ट केले. या बैठकीला जिल्ह्यातील खासदार, आमदार आणि नियोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.

# ६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन यंदा सांगलीत
### ज्येष्ठ कलावंत जी. एस. माजगावकर यांचा होणार सन्मान

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

कला संचालनालयामार्फत आयोजित ६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन (विद्यार्थी विभाग) यंदा सांगली येथे आयोजित करण्यात येत असून, १६ ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कलाविश्व महाविद्यालय, शांतिनिकेतन आवार येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांचा विशेष गौरव हे यंदाच्या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.



पालक मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, राज्यातील शासकीय व खासगी कला संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ मिळावे या उद्देशाने हे प्रदर्शन दरवर्षी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आयोजित केले जाते. यंदा राज्यभरातून ३ हजार,४९० विद्यार्थ्यांच्या ५ हजार ६८० कलाकृती प्राप्त झाल्या असून, त्यापैकी निवड समितीने १,२७५ उत्कृष्ट कलाकृतींची प्रदर्शनासाठी निवड केली आहे. या प्रदर्शनादरम्यान ज्येष्ठ कलावंत जी. एस. माजगावकर यांच्या दीर्घकालीन कलात्मक आणि शैक्षणिक योगदानाचा गौरव करत महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदापासून एक नवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यापूर्वी केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मर्यादित असलेल्या या व्यासपीठावर आता शासकीय रेखाकला परीक्षा (ग्रेड परीक्षा) व बालचित्रकला स्पर्धेतील गुणवंत शालेय विद्यार्थ्यांचाही गौरव केला जाणार आहे. शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना थेट राज्याच्या मुख्य कला प्रवाहात सहभागी करून घेण्याचा हा निर्णय कला क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

तसेच महाराष्ट्राचा समृद्ध कला वारसा पुढील पिढीकडे पोहोचविण्यासाठी हे प्रदर्शन महत्वाचे ठरेल. सांगलीकर कलाप्रेमी, विद्यार्थी आणि शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कलाविष्काराचा आनंद घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

## पुणे-सातारा महामार्गावर खाजगी बसचा भीषण अपघात



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :

पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील किकवी गावाच्या हद्दीत आज पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास एका खाजगी लक्झरी बसचा अपघात झाला. प्राथमिक माहिती नुसार, बसने पुढे चालत्या ट्रकला मागून धडक दिल्याने हा अपघात घडल्याचे समोर आले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले आहे.

अपघातानंतर बसचा चालक स्टेरिंग आणि सीटमध्ये अडकलेला होता. स्थानिक नागरिकांच्या मदतीने आणि आपत्कालीन बचाव पथकाच्या कार्यक्षम प्रयत्नांमुळे काही वेळातच त्याला सुरक्षितरीत्या सुटका करण्यात आली. या प्रक्रियेत चालकाला किरकोळ दुखापत झाल्याचे समजते.घटनेनंतर महामार्गावर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पोलिस आणि वाहतूक विभागाच्या तात्काळ कार्यवाहीमुळे बस क्रेनच्या सहाय्याने रस्त्याच्या कडेला हलवली गेली. त्यानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली.पोलीसांनी अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू केला असून, महामार्गावर वेग नियंत्रण आणि सुरक्षित अंतर राखण्याचे महत्त्व या घटनेमुळे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## मुलाने बापाला जिवंत जाळले

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :

दारूच्या व्यसनामुळे झालेल्या कुटुंबविवादाने पुण्यात धक्कादायक वळण घेतले. दांडेकर पुल परिसरात राहणाऱ्या रविंद्र भालेराव (वय ६१) यांना त्यांच्या मुलाने सागर भालेराव (वय २७) या दारूच्या नशेत रागाच्या भरात पेटवून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली. या घटनेत रविंद्र यांचा उपचार सुरु असताना दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, रविंद्र भालेराव हे सुतार व्यवसाय करीत होते आणि त्यांचा मुलगा सागर त्याच व्यवसायात त्यांच्यासोबत कार्यरत होता. सागरला दारूचे व्यसन असल्याचे सांगितले जाते. तो सतत दारू पित असे आणि अविवाहित होता. दांडेकर पुल परिसरात कुटुंबासह दोघेही राहत होते. घटनाक्रमानुसार, ७ फेब्रुवारी सायंकाळी दारूच्या नशेत वादविवाद वाढल्यावर रागाच्या भरात सागरने गाडीतील पेट्रोल वडिलांच्या अंगावर ओतला आणि काडीपेटीने त्यांना पेटवले. अचानक भडकलेल्या आगेला नागरिकांनी पाणी टाकून विझवण्याचा प्रयत्न केला.

## दारूच्या नशेत भरधाव स्विफ्टची धडक: दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :

सिंहगड रोड परिसरात भरधाव वेगाने आणि दारूच्या नशेत चालवलेल्या स्विफ्ट कारने दोन दुचाकींना धडक दिली. या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून, फ्लिपकार्टचा एक डिलिव्हरी बॉय जखमी झाला आहे. या प्रकरणी कारचालकासह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फियार्दी डिलिव्हरी बॉय वडगाव बुद्रुक परिसरात राहतात. ते सिंहगड रोड, सनसिटी आणि सिंहगड कॉलेज परिसरात डिलिव्हरीचे काम करतात. रात्री सिंहगड कॉलेज रोडवरील क्रिकेट ग्राऊंडजवळून ते आपल्या दुचाकीवरून (एमएच १२ एसआर ६१२७) जात असताना, समोरून भरधाव वेगात आलेल्या पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारने (एमएच १४ केएन ०९५७) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या धडकेमुळे फियार्दी बाजूला फेकले गेले. त्याच वेळी, त्या कारने मागून येणाऱ्या दुसऱ्या एका दुचाकीलाही (एमएच १८ बीएफ ००३६) धडक दिली. या अपघातात राहुल दिनकर पवार (वय अंदाजे ३०, रा. पाटण, ता. सिंदखेडा, जि. धुळे) हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने १०८ रुग्णवाहिकेने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांनी तपासणीपूर्वीच त्यांना मृत घोषित केले.

अपघातानंतर कारचालकाने जखमींना कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून पळ काढला. मात्र, स्थानिक नागरिकांनी आणि फियार्दीने पाठलाग करत जाधवनगर परिसरात ती कार अडवली. त्यावेळी कारचे पुढील बोनट चेंगरलेले आणि समोरील काच फुटलेली होती.

पोलिसांनी कारमधील तिघांना ताब्यात घेतले. कारचालक म्हणून सोजल शामराव औटी (वय २२, रा. सेल पिंपळगाव, आळंदी) याचे नाव समोर आले. त्याच्यासोबत अभिषेक संजय शिंदे (वय २१, रा. कोळणे फाटा, आळंदी) आणि विघ्नहर्ता शामराव औटी (वय २७, रा. सेल पिंपळगाव, आळंदी) हे देखील कारमध्ये होते. ससून रुग्णालयात केलेल्या वैद्यकीय तपासणीत तिघेही दारूच्या नशेत असल्याचे निष्पन्न झाले. सोजल औटी याने बेदरकारपणे आणि दारूच्या अंमलाखाली वाहन चालवून दोन दुचाकींना धडक दिली, ज्यामुळे एकाचा मृत्यू झाला आणि जखमींना मदत न करता तो पळून गेला.

## पुणे-नागपूर मार्गावर इंटरसिटी स्मार्टबस एक्यूआयची सुरुवात

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :

इंटरसिटी स्मार्टबसने पुणे-नागपूर मार्गावर इंटरसिटी स्मार्टबस.एक्यूआय सेवा सुरू केली आहे. या सेवेमुळे प्रवाशांना भारतातील पहिली शुद्ध हवा देणारी बससेवा उपलब्ध झाली आहे. पुण्यात आरटीओ येथील मोटार वाहन निरीक्षक श्रीपाद भागवत यांच्या हस्ते या सेवेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

दोन शहरांदरम्यानच्या लांब पल्ल्याच्या प्रवासात आरोग्य, सुरक्षितता आणि आरामदायीपणा वाढवण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.



इंटरसिटी स्मार्टबसचे सह-संस्थापक व सीईओ मनीष राठी यांनी सांगितले की, पुणे हे आंतरशहर प्रवासाचे महत्त्वाचे केंद्र आहे आणि पुणे-नागपूरसारख्या लांब पल्ल्याच्या मार्गांवर मोठी मागणी आहे. स्मार्टबस एक्यूआयद्वारे प्रवाशांना स्वच्छ आणि सुरक्षित हवेत प्रवास करता यावा, यासाठी बसमधील हवेच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

कंपनीच्या अंतर्गत पाहणीनुसार, दोन शहरांदरम्यानच्या प्रवासात बस केबिनमधील वायू प्रदूषणाची पातळी जागतिक आरोग्य संघटनेच्या मर्यादेपेक्षा दोन ते तीन पट अधिक असू शकते. यावर उपाय म्हणून, रिस्पायरर लिव्हिंग सायन्सेस या हवामान तंत्रज्ञान कंपनीच्या सहकार्याने बसमध्ये सतत हवा शुद्धीकरण प्रणाली आणि रिअल-टाइम एक्यूआय मॉनिटरिंगची सुविधा देण्यात आली आहे. पायलट प्रयोगात प्रवासाच्या 90 टक्क्यांहून अधिक काळ पीएम 2.5 पातळी सुमारे 40 µg/m³ राखण्यात यश आले.

## खासगी कोचिंग क्लासमध्ये शिक्षकांना मारहाणीचा आरोप

**सरकारवाडा पोलिसांत मनसेविरोधात तक्रार**

■ महासागर प्रतिनिधी नाशिक, दि. १२ :

नाशिक शहरातील शरणपूर रोडवरील एका खासगी कोचिंग क्लासमध्ये घडलेल्या प्रकारामुळे शैक्षणिक आणि राजकीय वतुर्ळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. मराठी भाषेचा अवमान झाल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते थेट क्लासमध्ये पोहोचले आणि तेथे गोंधळ घातल्याची घटना समोर आली. या प्रकरणी क्लास व्यवस्थापनाने सरकारवाडा पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर मनसेच्या पाच पदाधिकारी व कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मारहाण, धमकी आणि गोंधळ घालण्याचे आरोप या तक्रारीत नमूद करण्यात आले आहेत. या क्लासमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी बहुसंख्य विद्यार्थी मराठी भाषिक असून त्यांची मातृभाषा मराठी आहे. मात्र क्लासमध्ये शिकवणारे अनेक शिक्षक परप्रांतीय असल्याने त्यांना मराठी भाषेचे ज्ञान नसल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला. काही विद्यार्थ्यांना हिंदी समजण्यात अडचणी येत असल्याने शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये वारंवार वाद होत असल्याची माहिती मनविसेकडे पोहोचली होती.

मनसेचा आरोप असा आहे की, एका शिक्षकाने विद्यार्थ्यांना मराठीत शिकवणार नाही, शिकायचे असेल तर हिंदीतच शिका, असे उद्धटपणे सांगितले. यासोबतच मराठी भाषेला गावठी म्हणून हिणवल्याचेही आरोप करण्यात आले. ही माहिती मिळाल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष ललित वाघ, प्रदेश कार्यकारिणी सदस्य उमेश भोई, बाजीराव मते, उपजिल्हाध्यक्ष नितीन धानापुणे, शहर संघटक अक्षय कोंबडे, विभाग अध्यक्ष रोहित उगावकर आणि इतर कार्यकर्ते क्लासमध्ये दाखल झाले. क्लास व्यवस्थापनाकडून शिक्षकांची यादी मागवण्यात आली.

## लिफ्ट कोसळुन पाच जण जखमी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

भायखळा परिसरातील घोडपदेव क्रॉस लेन क्रमांक १ येथील जय कृपा टॉवर या इमारतीमधील उद्वाहन बुधवारी रात्री कोसळली. हा अपघात रात्री १० वाजताच्या सुमारास झाला. या अपघातात पाच जण जखमी झाले असून जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या १८ मजली इमारतीमधील उद्वाहनची केबल तुटल्याने चौथ्या मजल्यावरून खाली कोसळली. घटनेनंतर तात्काळ मुंबई अग्निशमन दल, पोलीस, बेस्ट कर्मचारी, १०८ रुग्णवाहिका सेवा, तसेच महापालिकेच्या विभाग कार्यालयातील कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. या अपघातात एकूण पाच जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यापैकी तीन जणांना जे.जे. रुग्णालयात, एकाला बालाजी रुग्णालयात, तर एकाला जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## एसटी बसला अपघात, १८ जण जखमी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

कल्याण-अहिल्यानगर रस्त्यावरील डुंबरवाडी येथे शाळेच्या सहलीसाठी निघालेली एसटी बस उलटून १८ जण जखमी झाले. गुरुवारी सकाळी ही दुर्घटना घडली. जखमींमध्ये १४ विद्यार्थी आणि चार शिक्षकांचा सामवेश आहे. नेवासा तालुक्यातील पिंपरी शाहाली येथून ओझर- लेण्याद्रीच्या दिशेने सहलीसाठी जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना घेऊन एसटी बस निघाली होती. चालकाचा बसवरील ताबा सुटला. बस वेगात असल्याने ती रस्त्याच्या कडेला असलेल्या पुलाच्या कठड्याला धडकली.

# एसटी कर्मचाऱ्यांचा पुन्हा आंदोलनाचा इशारा

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :

राज्य परिवहन मंडळाच्या (एसटी) हजारो कर्मचाऱ्यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसले आहेत. दुपारी १.३० वाजता राज्यातील सर्व एसटी डेपोमध्ये कर्मचारी एकत्र होणार आहेत. थकीत पगारवाढीचा प्रश्न त्वरित न सोडल्यास हे आंदोलन उग्र रूप धारण करण्याची शक्यता आहे.

आठवड्यांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटी कर्मचाऱ्यांना दरमहा ६,५०० रुपयांची पगारवाढ देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रशासनाच्या ढिलाईमुळे केवळ दोन महिन्यांपर्यंतच हा हप्ता कर्मचाऱ्यांना मिळाला; त्यानंतर तो बंद झाला. कामगार नेते संदिप शिंदे यांनी सरकारच्या वचनभंगाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. कर्मचारी प्रतिनिधींनी आमदार प्रताप सरनाईक यांची भेट घेतली होती, ज्यावेळी १२० कोटी रुपयांच्या फाईलवर स्वाक्षरी करून पगारवाढीचा प्रश्न कॅबिनेटमध्ये विचारात घेण्याचे आश्वासन मिळाले. मात्र, कॅबिनेट बैठक असूनही काही ठोस निर्णय न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सध्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वातावरण असल्याने विद्यार्थी एसटीवर



**कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या**

* थकीत ६,५०० रुपयांच्या पगारवाढीचा हप्ता त्वरित लागू करावा.
* पगारवाढीबाबत तात्पुरते उपाय न करता कायमस्वरूपी निर्णय घ्यावा.
* १२० कोटी रुपयांच्या प्रलंबित फाईलला त्वरित मंजुरी द्यावी.

अवलंबून आहेत. कर्मचाऱ्यांचे निदर्शन हे फक्त सरकारला दबाव देण्यासाठी असून सामान्य प्रवाशांना त्रास होऊ नये. जर सरकारने लवकर तोडगा न दिला, तर परीक्षेच्या काळातच एसटीची वाहतूक थांबवण्याची शक्यता आहे.

# भारत जोडोचा विचार आज नव्याने मांडण्याची गरज : कुमार केतकर
### बाबा आमटे राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यातून सामाजिक सलोख्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १२ :

१९८५ साली बाबा आमटे यांची भारत जोडो यात्रा निघाली नसती, तर देशात मोठा सामाजिक कलह निर्माण झाला असता. आज हिंदू-मुस्लिम द्वेष ज्या वेगाने वाढतो आहे, त्या पार्श्वभूमीवर बाबांच्या विचारांची पुन्हा नितांत गरज आहे, असे ठाम प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व माजी खासदार कुमार केतकर यांनी केले. बाबा आमटे यांच्या मानवतावादी विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या बाबा आमटे एकता अभियानतर्फे आयोजित राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. मुंबईत पार पडलेल्या या कार्यक्रमात सामाजिक सलोखा, विवेकवाद आणि माणुसकी जपण्याचा ठाम संदेश देण्यात आला.



या दिमाखदार सोहळ्यात कोलकात्याचे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व भारत जोडो अभियानाचे वरिष्ठ संयोजक ओ. पी. शहा ((कलकत्ता) यांना बाबा आमटे जीवनगौरव राष्ट्रीय पुरस्कार-२०२६ तर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष आणि विवेकवादी चळवळीचे अग्रणी कार्यकर्ते माधव बावगे (लातूर) यांना बाबा आमटे सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.या सोहळ्याला विचार पिठावर ज्येष्ठ पत्रकार व माजी खा. कुमार केतकर ख्यातनाम विधी तज्ज्ञ ॲड. असीम सरोदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक होत्या सह डॉ अशोक बेलखोडे, रविंद्र शिंदे चंद्रपूर, व्यंकटेश जोशी मुंबई आदी नामवंत मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. या राष्ट्रीय पुरस्काराचे स्वरूप एक लक्ष रुपये रोख, शाल, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे होते. कार्यक्रमाला सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते, विचारवंत, पत्रकार, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपल्या मनोगतात ओ. पी. शहा यांनी अत्यंत भावुक शब्दांत बाबा आमटेंशी असलेले नाते उलगडले. ते म्हणाले, जर बाबा आमटे मला भेटले नसते, तर कदाचित मी सामाजिक कार्याच्या या वाटेवर आलोच नसतो. बाबांनी भारत जोडोची संकल्पना माज्या मनात रुजवली. आज मी वेगवेगळ्या देशांमध्ये सामाजिक कार्य करत असलो, तरी त्या कामाच्या मुळाशी बाबांचीच प्रेरणा आहे.

पुरस्काराला उत्तर देताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते माधव बावगे म्हणाले, हा पुरस्कार माझा वैयक्तिक नाही, तर माज्यासोबत अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक समतेसाठी रस्त्यावर उतरलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे.

आम्ही बाबा आमटे यांच्यासोबत अनेक वर्षे काम केले. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन राज्यभर वेगवेगळ्या विषयांवर चळवळ उभी केली. त्या कायार्ला समाजाकडून मोठा प्रतिसाद मिळाला आणि त्यातून दीर्घकाळ टिकणारे समाजकारण उभे राहिले. या पुरस्कारामुळे विज्ञाननिष्ठ, विवेकी समाज घडवण्याच्या आमच्या लढ्याला नवी ऊर्जा मिळाली आहे.

ॲड. असीम सरोदे यांनी आपल्या भाषणातून सध्याच्या सामाजिक परिस्थितीवर तीव्र शब्दांत भाष्य केले. ते म्हणाले, आज सामाजिक काम करताना अनेक अडचणी येतात. पुढून होणारे अनेक वार हे धार्मिक स्वरूपाचे असतात. राजकारणातून निर्माण होणारी उदासीनता ही समाजाच्या मानसिक स्वास्थ्याचा भाग बनत चालली आहे. धार्मिक अनुकरणाच्या खोट्या पद्धती समाजात खोलवर रुजवल्या जात आहेत. याला आळा घालण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र पुढाकार घेणे आवश्यक आहे. बाबा आमटेंचे विचार आज अधिक धारदारपणे मांडण्याची गरज आहे. सध्याच्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना केतकर पुढे म्हणाले, आजचे वातावरण अत्यंत गंभीर आहे.

# अंजनगाव परिसरात रेशन धान्याचा काळाबाजार?

## पाळेमुळे परतवाड्यापर्यंत | हजारो क्विंटल तांदूळ तस्करी

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, (दि.12)** - अंजनगाव शहरासह ग्रामीण भागात गरिबांच्या हक्काच्या रेशन धान्याचा मोठ्या प्रमाणात कथित काळाबाजार होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. अंजनगावातून संकलित होणारा तांदूळ परतवाडा–चांदूरबाजार मार्गावरील एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या गोडाऊनमध्ये पोहोचत असल्याचा आरोप स्थानिक पातळीवर केला जात आहे. या व्यवहारामागे राजकीय वरदहस्त व काही अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचीही चर्चा आहे.

**तस्करीची कथित पद्धत**

मिळालेल्या माहितीनुसार, रेशनकार्ड धारकांकडील तांदूळ काही ठिकाणी 20 ते 22 रुपये किलो दराने विकला जात असल्याचे सांगितले जाते. फिरते दलाल व स्थानिक मध्यस्थ ग्रामीण भागात घरोघरी जाऊन तांदूळ गोळा करतात. त्यानंतर हा माल शहरातील काही गोडाऊनमध्ये साठवून रात्रीच्या वेळी पिकअप व ट्रकद्वारे अंजनगाव-पथ्रोट मार्गे परतवाड्याकडे रवाना केला जात असल्याचे बोलले जाते.



### परतवाड्यातील गोडाऊनवर बोट

परतवाडा-चांदूरबाजार रोडवरील एका मोठ्या गोडाऊनमध्ये दरमहा हजारो क्विंटल तांदूळ जमा होत असल्याचा आरोप आहे. संबंधित व्यापाऱ्याचे मोठ्या अधिकाऱ्यांशी व राजकीय नेत्यांशी संबंध असल्यामुळे ठोस कारवाई टळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न

या कथित प्रकाराची माहिती स्थानिक पोलिसांना व महसूल विभागाला असूनही कारवाई का होत नाही, असा सवाल जनतेतून उपस्थित केला जात आहे. दरमहा मालवाहू गाड्यांची ये-जा सुरू असल्याचा आरोप करत संताप व्यक्त केला जात आहे.

### कठोर कारवाईची मागणी

गोरगरिबांच्या हक्काच्या धान्यावर डल्ला मारणाऱ्यांविरुद्ध जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी विशेष मोहीम राबवून सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अंजनगाव तालुक्यातील नागरिकांनी केली आहे.



# वचपा काढण्यासाठी धाडले यमसदनी

## जळालेल्या अवस्थेतील अनोळखी मृतदेह प्रकरणाचा उलगडा; खुनाचा गुन्हा उघड




### पाच आरोपी अटकेत

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, (दि.12)**- येथील पोलीस स्टेशन हद्दीत आढळलेल्या जळालेल्या अवस्थेतील अनोळखी मृतदेह प्रकरणाचा पोलिसांनी उलगडा करत खुनाचा गुन्हा उघडकीस आणला आहे. या प्रकरणी पाच आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून एका विधीसंघर्षित बालकालाही ताब्यात घेतले आहे. पैशाचा कारणातून वडीलाला केल्याला मारहाणीचा वचपा काढण्याकरिता ही सुनियोजित हत्या करण्यात आल्याचे समोर आले आहे. बुधवार (दि.11 फेब्रुवारी 2026) सकाळी वाघडोह-खोडगाव रोडवरील मारुती जहानपूर शेतशिवार परिसरात जळालेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. तपासादरम्यान धरणाच्या कालव्याच्या फॉलमध्ये जळालेल्या अवस्थेतील मानवी मृतदेह आढळून आला. तसेच परिसरात चारचाकी वाहनाच्या टायरचे ठसे दिसून आले. मृतदेहाची ओळख पटू न शकल्याने अज्ञात आरोपीविरुद्ध कलम 103(1), 238 भा.न्या.सं. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखा तसेच पथ्रोट व अंजनगाव सुर्जी येथील पथकांनी समांतर तपास सुरू केला.

### शुभमने फोडले बिंग

तांत्रिक पुरावे व गोपनीय माहितीच्या आधारे तपास करताना पद्मश्री हॉटेलचा मालक शुभम मोहनलाल रॉय (वय 28, रा. बुधवारा, अंजनगाव सुर्जी) संशयाच्या भोवऱ्यात सापडला. शुभम रॉय यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. मात्र, अधिक तपासात त्याने गुन्ह्याची कबुली दिली. कबुलीनुसार, आर्वी (जि. वर्धा) येथील शेख शाहरुख शेख रऊफ वाने याने पैशांच्या कारणावरून प्रशात हरीचंद्र महाजन (वय 59 वर्ष रा. गणपतो वार्ड आर्वी जि. वर्धा) यांना शिवीगाळ व मारहाण केली होती. या रागातून प्रशांत महाजन, त्यांचा मुलगा टिकेश प्रशांत महाजन (वय 28) व अली अजगर सब्दर हुसेन(वय 28 वर्ष रा.जाजु वाडी आवी जि. वर्धा) यांनी खूनाचा कट रचला. अली अजगर याने मृतकास पैशांचे आमिष दाखवून गावाबाहेर बोलावले. त्यानंतर टिकेश व अली अजगर यांनी शाहरुख यास मारहाण करून ठार मारले. प्रेत चारचाकी वाहनाने लेहगाव येथे आणून शुभम रॉय व त्याचे साथीदार हर्षीत प्रकाश गौर (वय 19 वर्ष भोईपुरा बुधवारा अंजनगांव सुजी), निखील दिपचंद गौर (वय 32 वर्ष रा. भोईपुरा बुधवारा अंजनगांव सुजी) यांच्या मदतीने शहानूर धरणाच्या कालव्यात जाळण्यात आले.

### विधी संघर्षीत बालकाचा समावेश

या प्रकरणात आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून एक विधीसंघर्षित बालकाचाही समावेश आहे. आरोपींकडून महिंद्रा एक्सयुव्ही 500 व सात मोबाईल असा एकूण 5.70 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पुढील तपास पोलीस स्टेशन पथ्रोट करीत आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व संबंधित पोलीस पथकांनी केली असून पुढील तपास पोलीस स्टेशन पथ्रोट करीत आहे.

# शेतकऱ्याच्या घरात सशस्त्र चोरी

## सोन्या-चांदीसह साडेपाच लाखांचा ऐवज लंपास

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.12)** - ब्राह्मणवाडा थडी पोलिस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या घाटलाडकी येथील बारीपुरा भागात शेतकरी मितालेसिंग जगदेवसिंग पवार (वय 44) यांच्या घरात मध्यरात्री सशस्त्र चोरी झाल्याची घटना घडली. चोराने सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण सुमारे 5 लाख 38 हजार किमतीचा ऐवज चोरून नेला.

मिळालेल्या माहितीनुसार, मितालेसिंग पवार हे मंगळवारी 10 फेब्रुवारीच्या रात्री आपल्या शेतातील संत्र्याच्या बागेला पाणी देण्यासाठी गेले होते. पहाटे सुमारे 3.30 वाजता ते घरी परतले असता घराचे कुलूप उघडे असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी घरात प्रवेश करताच हातात टॉमी बंदूक घेऊन चेहरा झाकलेला चोर घरात उभा असल्याचे दिसून आले. पवार यांनी पाहताच चोराने पळ काढला. त्यानंतर घराची तपासणी केली असता सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले आढळले. चोराने कपाटातून 40 हजार रोख, 75 हजार किमतीची 25 ग्रॅम सोन्याची साखळी, 1 लाख 2 हजार किमतीच्या चार सोन्याच्या अंगठ्या, 1 लाख 12 हजार किमतीच्या सात मुलांच्या अंगठ्या, 80 हजार किमतीचे ब्रेसलेट तसेच दुसऱ्या खोलीतून 1 लाख 20 हजार रोख रक्कम, चांदीची मूर्ती आणि सुमारे 5 लाख 38 हजार किमतीची चांदीची प्लेट असा एकूण मोठ्या प्रमाणात ऐवज चोरून नेला. या घटनेनंतर मितालेसिंग पवार यांनी ब्राह्मणवाडा थडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### विषारी औषध प्राशन करून इसमाची आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, (दि.12)** - राजुरा बाजार येथील एका 55 वर्षीय ईसमाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना आज गुरूवारी उघडकीस आली. शेतीचा वाद असल्याच्या फिर्यादी वरून एका इसमाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दिलीप माहुरे (55) असे मृतकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार काल बुधवारी दुपारच्या सुमारास दिलीप माहुरे यांनी राहत्या घरी विष प्राशन केले होते. त्यानंतर त्यांना उपचारासाठी वरुडच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी त्यांना अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला होता. मात्र, गुरूवारी सकाळी उपचारादरम्यान त्यांचा अमरावतीच्या रुग्णालयातच मृत्यू झाला. दरम्यान राजुरा बाजार येथीलच हरी भोंडे याचेशी दिलीप माहुरे यांचा शेतीच्या करणावरुन वाद होता. 10 फेब्रुवारी 2026 रोजी त्यांच्यात पुन्हा वाद झाला. शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. अशा आशयाची फिर्याद मृतकाची पत्नी प्रतिभा माहुरे यांनी पोलिसात दिल्यावरुन वरुड पोलिसांनी हरी भोंडे यांचेविरुद्ध बीएनएस 352, 351(2) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# बोलेरो पिकअपची धडक



## सरपंचाचा दुर्दैवी मृत्यू



**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा (दि.12)**- तिवासा-कुऱ्हा रस्त्यावर अज्ञात बोलेरो पिकअप वाहनाने दुचाकीला समोरासमोर धडक दिल्याने वाढोना ग्रामपंचायतीचे सरपंच प्रशांत हुडे (वय 45, रा. वाढोना, ता. धामणगाव रेल्वे) यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी दुपारी कुऱ्हा परिसरात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत हुडे हे वाढोना ग्रामपंचायतीचे सरपंच तसेच तहसील कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक होते. त्यांनी गुरुवारी सकाळी त्यांच्या मुलाला बारावीच्या परीक्षेसाठी अंजनसिंगी येथील शाळेत सोडले होते. त्यानंतर मित्र प्रीतम काळे (वय 35, रा. वाढोना) यांच्यासह कुऱ्हा येथील शंकरपट महोत्सव पाहण्यासाठी दुचाकीने जात असताना कुऱ्हा येथील तिवसा रस्त्यावरील श्रीकृष्ण मंगल कार्यालयाजवळ अज्ञात बोलेरो पिकअप ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात प्रशांत हुडे यांचा जागीच मृत्यू झाला, तर प्रीतम काळे यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने अमरावती जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच कुऱ्हा पोलीस उपनिरीक्षक विकास बिरे आणि अनिल निघोट यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. प्रशांत हुडे यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे.

# विकासात्मक योजनांची ‘कंबरमोडी’ थांबविण्याला प्रथम प्राधान्य!

- आरोग्य, शिक्षणासह प्लास्टिकमुक्त अमरावतीसाठी सूक्ष्म नियोजन
- उपमहापौर सचिन भेंडे यांची ‘महासागर’ला विशेष मुलाखत

**मनिष जगताप**

**अमरावती, (दि. 12)**- निधी येतो, योजना बनतात; मात्र प्रशासनाच्या इच्छाशक्तीअभावी त्या कोलमडतात. चांगल्या योजनांची ‘कंबरमोडी’होते. शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छता या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांतील ही ‘कंबरमोडी’थांबविणे हे माझे प्रथम प्राधान्य राहील. यासाठी सूक्ष्म नियोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल, यावर विशेष भर देणार असल्याची माहिती अमरावती महापालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे यांनी दिली. पदभार स्वीकारल्यानंतर ‘दैनिक महासागर’ला दिलेल्या विशेष मुलाखतीदरम्यान त्यांनी भविष्यातील कामाचा आराखडा मांडला.



### शहर स्वच्छतेसाठी कोणती पावले उचलली जातील?

**भेंडे** - शहर स्वच्छतेसाठी प्लास्टिकमुक्त अमरावती अत्यावश्यक आहे. शहरातील कचऱ्याच्या ढिगाऱ्यांवर नजर टाकली तर सर्वाधिक कचरा प्लास्टिक कॅरीबॅगचा असल्याचे दिसते. या कॅरीबॅग येतात कुठून, वितरक कोण, किरकोळ विक्रेते कोण ङ्क ही संपूर्ण साखळी कायमस्वरूपी खंडित करणे गरजेचे आहे. नागरिकांनीही स्वत:हून कॅरीबॅगचा वापर सोडल्यास शहर स्वच्छतेकडे ते मोठे पाऊल ठरेल.

### आरोग्याप्रमाणे शिक्षणाला किती महत्त्व देता?

**भेंडे** - आरोग्याइतकेच शिक्षणालाही महत्त्व आहे. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शहरात उभारण्यात आलेल्या अष्टकोनी शाळा इमारतींची दुरवस्था आपण पाहत आहोत. शासनाने ज्या उद्देशाने या इमारती उभारल्या, त्या उद्देशालाच हरताळ फासला गेला आहे. जिल्हा नियोजनातून महापालिकेच्या मागण्यांवर निधी दिला जातो; मात्र तो निधी जातो तरी कुठे, हा प्रश्न अनुत्तरित आहे. एआयच्या युगात अत्याधुनिक ग्रंथालये, विद्यार्थ्यांना विनामूल्य पुस्तके व शैक्षणिक साहित्य मिळणे गरजेचे आहे. निधी येऊनही शिक्षणाचा दर्जा अपेक्षेप्रमाणे वाढत नाही. खासगी शाळांच्या तुलनेत हा दर्जा वाढणे आवश्यक आहे. महापालिकेत सीबीएसई पॅटर्न व मराठी अभ्यासक्रम मोफत उपलब्ध असतानाही विद्यार्थी संख्या कमी का, यावर काम करणे गरजेचे आहे. यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात येईल.

### आणखी कोणत्या महत्त्वाच्या संकल्पना आहेत?

**भेंडे** - दुर्दशा झालेल्या उद्यानांचे पुनर्जीवन करणे, बंगळुरू पॅटर्ननुसार रबरी चेकर्स बसविणे, जेणेकरून फिरणाऱ्यांना मणक्यांचे आजार उद्भवणार नाहीत, यावर भर राहील. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी उपयुक्त अशी उद्याने निर्माण करण्याचे प्रयत्न राहतील. हे सर्व प्रशासनावर दबाव टाकून नव्हे, तर त्यांना सोबत घेऊन केले जाईल.

### उपमहापौरपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर डोक्यात कोणत्या योजना आहेत?

**भेंडे** - सर्वप्रथम आरोग्य या विषयात काम करण्याचे ठरविले आहे. कारण नागरिकांच्या सर्वाधिक तक्रारी आरोग्याशी निगडित आहेत. 15 व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त निधीतून महापालिकेला आरोग्यविषयक मोठ्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जवळपास सर्व प्रकारच्या यंत्रसामग्री महापालिकेकडे आहे; मात्र ती कुलूपबंद अवस्थेत आहे. कोट्यवधींच्या औषध घोटाळ्याची माहितीही पुढे येत आहे. हा प्रकार थांबवून सुविधा तळागाळातील रुग्णांपर्यंत पोहोचविण्याचे माझे प्रयत्न राहतील. यासाठी आतापासूनच कामाला लागलो आहे.

# विहिगाव शिवारात आदिवासी महिलेचा संशयास्पद मृत्यू

## झटका मशीन की मद्यप्राशन? परिसरात चर्चेला उधाण

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी (दि. 12)** - अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विहिगाव शिवारात 35 वर्षीय आदिवासी महिलेचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना रामकृष्ण धनोकार यांच्या शेतात घडली असून, मृत्यूचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. त्यामुळे विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

मध्य प्रदेशातील बैतूल जिल्ह्यातील जुनापाणी येथील पिंकी इडापाचे (वय 35) ही महिला कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी विहिगाव परिसरात मजुरीसाठी आली होती. कापूस वेचणी व हरभरा कापणीचा हंगाम सुरू असल्याने अनेक आदिवासी बांधव या भागात स्थलांतरित झाले आहेत. बुधवारी रात्रीच्या सुमारास पिंकीचा मृतदेह धनोकार यांच्या शेतात आढळून आला. शेतमालकाने पोलीस पाटील राहुल बोरडे यांना माहिती दिल्यानंतर रहिमापूर पोलिसांना पाचारण करण्यात आले.



घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणेदार अनंत वडतकर, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे व पथकाने घटनास्थळी धाव घेतली. अचलपूर येथील फॉरेन्सिक तज्ज्ञांनी पाहणी करून नमुने गोळा केले. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

काही नागरिकांच्या मते शेतातील ‘झटका मशीन’ किंवा विद्युत धक्का लागल्याने मृत्यू झाला असावा. तर काहींच्या मते ती गेल्या काही दिवसांपासून मद्यप्राशन करत होती. सर्व बाजूंनी तपास सुरू असून अहवालानंतरच कारण स्पष्ट होईल, असे ठाणेदार वडतकर यांनी सांगितले.

## इतर राज्ये मंदिरे आणि पुतळे बांधण्यात व्यस्त
# केरळने उभारले ज्ञानाचं मंदिर!

देशाच्या विकासाची दिशा नेमकी कुठे चालली आहे, हा प्रश्न आज अधिक तीव्रतेने समोर उभा राहिला आहे. एकीकडे भव्य मंदिरे, उंचच उंच पुतळे, कोट्यवधींचे सौंदर्यीकरण प्रकल्प यांची जाहिरातबाजी सुरू असताना; दुसरीकडे केरळने शांतपणे, पण ठामपणे इतिहास घडवणारा निर्णय घेतला आहे. पदवीपर्यंत मोफत शिक्षण देणारे देशातील पहिले राज्य होण्याचा हा निर्णय केवळ आर्थिक नाही, तर वैचारिक क्रांतीचा आहे. हा निर्णय म्हणजे विकासाची खरी व्याख्या काय असते, यावर दिलेला सडेतोड उत्तर आहे.

-----------------



**इतर राज्ये मंदिरे आणि पुतळे बांधण्यात व्यस्त असताना. केरळ हे पदवीपर्यंत मोफत शिक्षण देणारे पहिले राज्य बनले आहे.**

मंदिरं आणि पुतळे श्रद्धेचं प्रतीक असू शकतात; पण शिक्षण हे समाजाच्या भवितव्याचं बीज असतं. श्रद्धा आत्म्याला समाधान देते, पण शिक्षण माणसाला प्रश्न विचारायला शिकवतं. शिक्षण माणसाला देव शोधायला नाही, तर स्वतःमधील शक्ती ओळखायला भाग पाडतं. केरळने हाच मार्ग निवडला आहे, माणसात गुंतवणूक करण्याचा मार्ग.

आज देशात शिक्षण ही सेवा न राहता एक महागडी वस्तू बनली आहे. शाळा म्हणजे व्यवसाय, कॉलेज म्हणजे कॉर्पोरेट संस्था, आणि पदवी म्हणजे केवळ नोकरी मिळवण्याचं साधन अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

गरीब, कष्टकरी, शेतकरी, आदिवासी, दलित, अल्पसंख्याक यांच्यासाठी शिक्षण अजूनही स्वप्नच आहे. अशा वेळी केरळचा निर्णय म्हणजे या व्यवस्थेला दिलेला जोरदार चपराक आहे. केरळने हे पहिल्यांदाच केलं असं नाही. देशात सर्वाधिक साक्षरता दर, आरोग्य निदेशांक, स्त्री-पुरुष समानता, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था या सगळ्यांमध्ये केरळ नेहमीच आघाडीवर राहिलं आहे.



**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

कारण इथे विकासाची संकल्पना रस्ते, पूल, पुतळे यापुरती मर्यादित नाही; इथे विकास म्हणजे माणूस केंद्रस्थानी आहे. मानव विकास ही संकल्पना इथे केवळ कागदावर नाही, तर धोरणात आणि कृतीत आहे.

आज इतर अनेक राज्यांमध्ये हजारो कोटी रुपये पुतळ्यांवर खर्च होत आहेत. त्या पुतळ्यांची उंची जितकी वाढते, तितकी सामान्य माणसाच्या प्रश्नांची खोली वाढत जाते.

बेरोजगारी, कुपोषण, शाळाबाह्य मुलं, गळती (ड्रॉपआउट), शिक्षणातील असमानता, हे प्रश्न मात्र तसेच राहतात. कारण प्राधान्यक्रम चुकलेला आहे. केरळने तो प्राधान्यक्रम बरोबर ओळखला आहे. पदवीपर्यंत मोफत शिक्षण म्हणजे केवळ फी माफ करणे नाही; तो सामाजिक न्यायाचा निर्णय आहे. हा निर्णय सांगतो की शिक्षण ही कोणाची मक्तेदारी नाही.

तो सांगतो की गरीबाचा मुलगाही डॉक्टर, अभियंता, संशोधक, प्रशासक होऊ शकतो. तो सांगतो की मुलींचं शिक्षण खर्चामुळे अर्धवट थांबणार नाही. हा निर्णय म्हणजे पिढ्यांच्या दारिद्र्याच्या साखळ्या तोडण्याचा प्रयत्न आहे.

आज देशात राष्ट्र उभारणीच्या नावाखाली भावनिक घोषणा दिल्या जातात. पण राष्ट्र उभं राहतं ते सुशिक्षित नागरिकांवर. प्रश्न विचारणाऱ्या, विवेकी, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या नागरिकांवर.

केरळचा निर्णय हा अंधश्रद्धा, जातीयता, धार्मिक ध्रुवीकरण यांना दिलेला मौनातला प्रतिकार आहे. कारण शिक्षण माणसाला अंध बनवत नाही, तर डोळे उघडायला शिकवतं. हा निर्णय राजकीय धाडसाचाही आहे. कारण शिक्षणावर खर्च करणं म्हणजे लगेच दिसणारा फायदा नसतो.

पुतळा उभा केला की तो लगेच दिसतो, फोटो काढता येतो, उद्घाटन करता येतं. पण शिक्षणाचं फळ पिढ्यांनंतर दिसतं. ते मथळ्यांत येत नाही, पण इतिहासात नोंदवलं जातं. केरळने लोकप्रियतेपेक्षा भविष्य निवडलं आहे.

आज खासगी शिक्षण संस्थांच्या विळख्यात अडकलेला मध्यमवर्ग आणि गरीब वर्ग कर्जाच्या ओझ्याखाली दबला आहे. शिक्षणासाठी कर्ज, नोकरीसाठी संघर्ष, आणि आयुष्यभर त्याची परतफेड, हा दुष्टचक्र बनलं आहे. केरळचा निर्णय या चक्राला तोडण्याचा प्रयत्न आहे.

शिक्षण मोफत असेल, तर तरुण अधिक निर्भय होतील, नवकल्पनांकडे वळतील, संशोधन, कला, समाजसेवा यांसारख्या क्षेत्रांकडे पाहू शकतील. काही जण विचारतील, हे आर्थिकदृष्ट्या परवडेल का? पण खरा प्रश्न असा आहे की पुतळे परवडतात, पण शिक्षण नाही का? जाहिराती परवडतात, पण ग्रंथालयं नाही का? उत्सव परवडतात, पण विद्यापीठं नाही का? हा प्रश्न पैशाचा नाही, तर इच्छाशक्तीचा आहे. केरळने ती इच्छाशक्ती दाखवली आहे.

केरळचा हा निर्णय देशाला आरसा दाखवतो. तो विचारायला भाग पाडतो, आपण देव उंच करतोय, पण माणूस का खुंटतोय? आपण इतिहासाचं स्मारक उभं करतोय, पण भविष्य का दुर्लक्षित आहे? हा लेखनप्रपंच केवळ केरळचं कौतुक करण्यासाठी नाही; तर इतर राज्यांना जागं करण्यासाठी आहे.

आज गरज आहे ती शिक्षणाला राजकीय अजेंड्याच्या केंद्रस्थानी आणण्याची. शिक्षण म्हणजे खर्च नाही, ती गुंतवणूक आहे. सर्वात सुरक्षित, सर्वात दूरगामी आणि सर्वात मानवी गुंतवणूक. केरळने ते ओळखलं आहे. आता प्रश्न असा आहे की, देश उरलेल्या राज्यांनी केव्हा ओळखणार?

इतिहास साक्ष देतो, ज्या समाजाने शस्त्रांपेक्षा शाळा उभारल्या, त्या समाजाने जग बदललं. ज्या समाजाने पुतळ्यांपेक्षा पुस्तकांना महत्त्व दिलं, त्या समाजाने विचारांची सत्ता मिळवली. केरळने ज्ञानाचं मंदिर उभारलं आहे.

आता देशाला ठरवायचं आहे. आपण श्रद्धेच्या सावलीत राहायचं की विवेकाच्या प्रकाशात पुढे जायचं? कारण शेवटी एकच सत्य उरतं, पुतळे उंच असू शकतात, पण शिक्षणाशिवाय माणूस उभाच राहू शकत नाही.

# जिल्हा परिषद शाळा आज आणि उद्या

जिल्हा परिषद शाळा म्हणजे ग्रामीण भारताच्या शिक्षणव्यवस्थेचा कणा. या शाळांमधूनच शेतकरी, कामगार, आदिवासी, वंचित घटकांची मुले पहिल्यांदा शिक्षणाच्या प्रकाशात पाऊल टाकतात. मात्र आज या शाळांकडे पाहण्याची समाजाची, प्रशासनाची आणि शासनाची दृष्टी अत्यंत दुर्लक्षित, औपचारिक आणि कागदी झाली आहे.

शाळा आहेत, शिक्षक आहेत, पटसंख्या आहे एवढ्यावरच समाधान मानले जाते; पण शिक्षण घडते आहे का? हा मूलभूत प्रश्न कुणालाच अस्वस्थ करत नाही. जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारायचा असेल तर सर्वप्रथम या व्यवस्थेकडे पाहण्याची दृष्टी बदलावी लागेल आणि शासनाने स्वतःच्या चुकांची प्रामाणिक कबुली द्यावी लागेल.

आज शासनाची सर्वात मोठी चूक म्हणजे शिक्षणाकडे योजना म्हणून पाहणे आणि प्रक्रिया म्हणून न पाहणे. दरवर्षी नवनवीन योजना येतात ,डिजिटल क्लासरूम, टॅब, स्मार्ट बोर्ड, ऑनलाइन प्रशिक्षण,पण या सगळ्यांचा वर्गात प्रत्यक्ष परिणाम किती झाला याचे आत्मपरीक्षण होत नाही.

**सारिका पावडे-काळे**
**(पत्रकार मुंबई)**
**८००७२३९५०२**

अनेक शाळांमध्ये वीज नाही, इंटरनेट नाही, वर्गखोल्या गळक्या आहेत; तरीही डिजिटल शिक्षणाचा आग्रह धरला जातो. ही धोरणात्मक विसंगतीच जिल्हा परिषद शाळांचा दर्जा घसरवत आहे. तंत्रज्ञान साधन असायला हवे; उद्दिष्ट नव्हे, ही मूलभूत बाब शासन विसरते.

दुसरी गंभीर चूक म्हणजे शिक्षकांकडे पाहण्याची सरकारी भूमिका. शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा आत्मा आहे; पण शासनाने त्याला हळूहळू कारकून बनवले आहे. ऑनलाइन पोर्टल्स, ॲप्स, सर्वेक्षणे, अहवाल, निवडणुका, जनगणना, अभियान, या सगळ्यांत शिक्षक अडकलेला आहे. वर्गात शिकवायला वेळ नाही, पण कागद भरण्यासाठी अमाप वेळ आहे.

गुणवत्तापूर्ण अध्यापनासाठी मानसिक शांतता, तयारी आणि स्वायत्तता लागते; तीच शासन काढून घेत आहे. शिक्षक अपयशी आहेत असे ठपके लावले जातात; पण त्यांना काम करण्यासाठी आवश्यक वातावरण दिले का, हा प्रश्न विचारला जात नाही.

शासनाची तिसरी चूक म्हणजे जिल्हा परिषद शाळांकडे दुय्यम नजरेने पाहणे. खासगी शाळांना अप्रत्यक्ष सवलती, धोरणात्मक मोकळीक आणि क्वालिटीचा शिक्का दिला जातो; तर जिल्हा परिषद शाळांना गरीबांची शाळा अशी लेबले लावली जातात.

या मानसिकतेचा परिणाम थेट पालकांवर होतो. शासन स्वतःच आपल्या शाळांवर विश्वास दाखवत नसेल, तर पालक का दाखवतील? पटसंख्या घटली की शाळा बंद करण्याचे धोरण आखले जाते; पण शाळा का ओस पडते, याचे मूळ कारण शोधण्याची तसदी घेतली जात नाही.

चौथी मोठी चूक म्हणजे शिक्षक भरती आणि प्रशिक्षणाबाबतची उदासीनता. अनेक शाळा वर्षानुवर्षे शिक्षकांच्या कमतरतेने चालतात. एका शिक्षकावर दोन-तीन वर्गांची जबाबदारी येते. अशा परिस्थितीत दर्जेदार शिक्षणाची अपेक्षा करणे म्हणजे केवळ ढोंग ठरते. प्रशिक्षण कार्यक्रम हे बहुतेक वेळा औपचारिक, वरवरचे आणि सैद्धांतिक असतात. शिक्षकांच्या प्रत्यक्ष वर्गातील अडचणी, ग्रामीण वास्तव, बहुभाषिकता, पहिली पिढी शिकणारी मुले, या सगळ्यांचा विचार प्रशिक्षणात दिसत नाही.

शासनाची पाचवी चूक म्हणजे शिक्षणाच्या गुणवत्तेऐवजी आकडेवारीवर भर देणे. किती शाळा, किती विद्यार्थी, किती टक्के निकाल, या आकड्यांतून व्यवस्थेचे कौतुक केले जाते; पण मूल वाचू शकते का, लिहू शकते का, विचार करू शकते का, प्रश्न विचारण्याची हिंमत आहे का... या गोष्टी मोजण्याची इच्छाच नसते. गुणवत्तेचा प्रश्न आला की जबाबदारी शिक्षकांवर ढकलली जाते; पण धोरणात्मक अपयशाची जबाबदारी कोणी घेत नाही.

जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारायचा असेल तर सर्वप्रथम शासनाने स्वतःला प्रश्न विचारायला हवा—आपण या शाळांकडे केवळ सामाजिक कर्तव्य म्हणून पाहतो आहोत की राष्ट्रनिर्मितीची प्रयोगशाळा म्हणून? शाळा बंद करणे हा उपाय नाही; शाळा सक्षम करणे हा उपाय आहे. शिक्षकांना विश्वास, स्वायत्तता आणि सन्मान दिल्याशिवाय दर्जा सुधारणे अशक्य आहे. स्थानिक समुदाय, पालक, ग्रामपंचायत यांना शाळेशी जोडण्याऐवजी केवळ आदेश आणि परिपत्रकांवर शिक्षण चालवण्याचा हट्ट सोडावा लागेल. शिक्षण हा खर्च नाही; तो दीर्घकालीन गुंतवणूक आहे, हे शासनाने मनापासून स्वीकारले, तरच जिल्हा परिषद शाळा पुन्हा विश्वासार्ह ठरतील. अन्यथा कागदावर योजना वाढतील, पण वर्गात शिकण्याचा प्रकाश मात्र मंदावतच जाईल.

जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारायचा असेल तर सरकारने इतरांना दोष देणे थांबवून आरशात पाहण्याची तयारी ठेवली पाहिजे, कारण अपयशाची मुळे धोरणात आहेत, शाळेत नाहीत.

# रेडिओ मनोरंजनाचे सर्वात जुने माध्यम

(१३ फेब्रुवारी : आंतरराष्ट्रीय रेडिओ दिन)

सुजलाम् सुफलाम् मलयज शितलाम्, शस्य शामलाम् मातरम्, वन्दे मातरम् ! असे सकाळचे मंगल सूर आज हरवले आहे, असे वाटते. एकेकाळी रेडिओ हा आपल्या जीवनाचा एक महत्वाचा भाग मानला जात होता. कारण माहिती, संवाद आणि गाण्यांच्या माध्यमातून मनोरंजनाचे महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून रेडिओचा उपयोग केला जात होता. मात्र, आज सर्वत्र नवनवीन माध्यमे आली आणि रेडिओचा वापर कमी झाला. दरवर्षी १३ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून साजरा केला जातो. परंतु टेलिव्हिजन आणि मोबाईलचा शोध लागल्यानंतर रेडिओचा वापर कमी झाला. मात्र, आजूनही रेडिओचे महत्त्व कमी झालेले नाही.

------------------

जगभरातील लोकांना शिक्षित करण्याबरोबरच आजपर्यंत माहितीची देवाणघेवाण आणि रेडिओने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच रेडिओ हे पत्रकारांसाठीसुद्धा एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे. रेडिओ हे माहिती पसरविण्याचे सर्वात शक्तिशाली साधन आहे.



**कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**7775041086**

१३ फेब्रुवारी १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिल्यांदा प्रसारण झाले. त्यामुळे हा दिवस जागतिक रेडिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पहिला जागतिक रेडिओ दिन औपचारिकपणे २०१२ मध्ये साजरा करण्यात आला होता. जागतिक रेडिओ दिन २०२२ची थीम "एवोलूशन- द वर्ल्ड इज ऑलवेज चेंजिंग होती. म्हणजेच विकासाबरोबर जगाचाही विकास होत आहे. थीम रेडिओची लवचिकता आणि टिकाऊपणा दर्शवते. याचा अर्थ जग जसजसे बदलत आहे, तसे रेडिओमध्येही नावीन्यता येत आहे. तरी आजही तो काळ आठवतो जेव्हा आपण रेडिओ ऐकून आनंदीत व्हायचो.

जागतिक रेडिओ दिवस दरवर्षी १३ फेब्रुवारी रोजी जगभरात साजरा केला जातो. या दिवशी दरवर्षी युनेस्को जगातील सर्व प्रसारक, संस्था आणि समुदायांच्या सहकार्याने विविध कार्यक्रम आयोजित करीत असतो. संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवर चर्चा करून लोकांना त्याबद्दल जागरूक केले जाते.

रेडिओ ही जगभरातील माहितीची देवाणघेवाण करणारी सेवा आहे. आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थितीत रेडिओचे महत्त्व वाढते. अशा परिस्थितीत जगभरातील तरुणांना रेडिओची गरज आणि महत्त्वाची जाणीव करून देणे, हा जागतिक रेडिओ दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे.

माहितीचा प्रसार करण्यासाठी रेडिओ हे सर्वात शक्तिशाली आणि स्वस्त माध्यम म्हणून ओळखले जाते. रेडिओ हे युगानुयुगे असले तरी त्याचा वापर संवादासाठी केला जात आहे. २०११ साली जागतिक रेडिओ दिनाची सुरुवात झाली. २०१०मध्ये स्पॅनिश रेडिओ अकादमीने प्रथमच १३ फेब्रुवारी हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला.

युनेस्कोच्या सदस्य देशांनी २०११मध्ये हा प्रस्ताव स्वीकारला आणि हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून घोषित केला. नंतर २०१२मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनेही ते स्वीकारले. त्यानंतर त्याच वर्षी १३ फेब्रुवारी रोजी युनेस्कोने प्रथमच जागतिक रेडिओ दिवस साजरा केला. याच दिवशी जागतिक रेडिओ दिन साजरा करण्याचे एक खास कारण आहे. वास्तविक, संयुक्त राष्ट्र रेडिओ १३ फेब्रुवारी १९४६ रोजी सुरू झाला. संयुक्त राष्ट्र रेडिओच्या वर्धापनदिनानिमित्त जागतिक रेडिओ दिवस साजरा केला जाऊ लागला.

रेडिओ म्हणजे एक असे यंत्र, जे विजेचा वापर करून इलेक्ट्रोमॅग्नेटिक तरंगे तयार करते, ज्यांच्या द्वारे संदेशाची देवाणघेवाण केली जाते. इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह पाठवणाऱ्या रेडिओला ट्रान्समीटर तर तरंगे म्हणजेच वेव्ह स्वीकारून त्याचे रूपांतर आवाजात करणाऱ्या रेडिओला रिसीव्हर असे म्हटले जाते. रेडिओ ३०० एचझेड इतक्या क्षमतेने इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह तयार करू शकते.

**(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)**

## अफलातून कार्यकर्ता परमेश्वर इंगोले यांचा प्रेरणादायी प्रवास

# कणसाच्या माईकपासून मंत्रालयापर्यंत



शेती, जनावरे यांत वावरणारा, शेतातील डुलणाऱ्या कणसाला हाताने धरून त्याचा माईक करीत पुढ्यात असलेल्या ताटांना जनता समजून भाषण देणारा एक लाजरा-बुजरा, साधा मुलगा पुढे जाऊन महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या, बेरोजगारांच्या, निराधार व युवकांच्या समस्या सोडवणारा अफलातून कार्यकर्ता बनला.

पुढे जाऊन आपला मुलगा नाव उज्ज्वल करणार, हे त्याच्या आई-वडिलांना लहानपणीच जाणवले होते. ग्रामीण जगण्यातील दाहक वास्तव आणि त्यावर काहीतरी करण्याची तीव्र आस त्याच्या डोळ्यांत बालपणापासूनच दिसत होती. सामाजिक आणि राजकीय पटलावर अभूतपूर्व यश संपादन करणारा अफलातून कार्यकर्ता म्हणून नावलौकिक मिळवलेल्या परमेश्वर इंगोले यांचा हा प्रवास निश्चितच नवचैतन्य निर्माण करणारा आहे.

हिंगोली जिल्ह्यातील बुद्रुक तालुक्यातील सोनगाव या छोट्याशा गावात, एका शेतकरी कुटुंबात, अशिक्षित आई-वडिलांच्या पोटी परमेश्वर शेषराव इंगोले यांचा जन्म झाला. ग्रामीण जीवनातील वास्तव आणि त्यातील भीषणतेचे चटके त्यांनी लहानपणीच सोसले.

मात्र आई-वडिलांनी मुलाने शिकून मोठे व्हावे, यासाठी नेहमीच त्याला प्रेरित केले. परिस्थितीशी दोन हात करायचे असतील तर शिक्षण हाच मार्ग आहे, या ठाम जिद्दीने परमेश्वर इंगोले यांनी बी.ए., एम.ए., डी.एड. आणि बी.एड.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

इतके शिक्षण घेऊनही परिस्थिती बदलण्याचे नाव घेत नव्हते. कारण शिक्षक भरतीसाठी आवश्यक असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (सीईटी) २०१० नंतर बंद झाली होती. परिणामी महाराष्ट्रभर सुमारे दहा लाख डी.एड. आणि बी.एड.धारक विद्यार्थी बेरोजगार झाले.

शिक्षक होऊन स्थिर जीवन मिळेल, या आशेने ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थी डी.एड., बी.एड.कडे वळले होते; मात्र शासनाच्या उदासीन धोरणामुळे त्यांच्या आयुष्याचा खेळ होताना पाहून परमेश्वर इंगोले पेटून उठले. याच क्षणी त्यांनी मनाशी पक्की खूणगाठ बांधली – आता फक्त लढायचे आणि डी. एड., बी.एड.धारकांना रोजगार मिळवून द्यायचाच!

या निर्धाराला योग्य दिशा आणि बळ मिळाले ते सकाळ माध्यम समूहाच्या यिन व्यासपीठामुळे.

महाविद्यालयाचा बिनविरोध अध्यक्ष म्हणून येथे त्यांची निवड झाली. या व्यासपीठाच्या माध्यमातून त्यांनी केवळ डी.एड., बी.एड.धारक बेरोजगारांचा प्रश्न मांडला नाही, तर युवक, कामगार, निराधार, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि महिला यांच्या हक्कांसाठी शासन व जनतेतील एक प्रभावी दुवा म्हणून ते कार्यरत राहिले.

बचत गटांच्या माध्यमातून शिक्षक आणि युवकांसाठी स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण केल्या. शेतकऱ्यांना कर्जमाफी व पीकविमा मिळावा यासाठी सातत्याने आंदोलने केली. ज्येष्ठ नागरिक, निराधार व दिव्यांगांना शासन योजनांचा लाभ मिळावा यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, शासन-लाभार्थी समन्वय साधून त्यांचा हक्क मिळवून देण्यात ते सदैव अग्रेसर राहिले.




**सुजाता बंडावार**
mahasagarngp@gmail.com

महाराष्ट्रातील दहा लाख डी.एड., बी.एड.धारकांना नोकऱ्या मिळाव्यात, यासाठी त्यांनी राज्यभर जिल्हा परिषदांसमोर आंदोलने केली, मुंबईच्या आझाद मैदानावर आवाज बुलंद केला, राज्यव्यापी मोर्चे काढले. अखेरीस शासनाला झुकविण्यात यश आले आणि २०१९ मध्ये पवित्र पोर्टलद्वारे राज्यभर शिक्षक भरती प्रक्रिया सुरू झाली. यातून सुमारे आठ हजार विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला. २०२२ मध्ये शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा पार पडला.

शिक्षण सेवकांना मिळणाऱ्या ६,००० रुपयांच्या तुटपुंज्या मानधनात वाढ व्हावी, यासाठी त्यांनी सातत्याने आंदोलने केली. परिणामी गेल्या वर्षी शिक्षण सेवकांचे मानधन १६,००० रुपये झाले.

एवढ्यावरच न थांबता, पोलीस भरतीची तयारी करणारे विद्यार्थी, तसेच एमपीएससी परीक्षार्थी यांच्यासाठीही त्यांनी सक्रिय चळवळी उभ्या केल्या.

ते अभिमानाने सांगतात की ग्रामपंचायत कर्मचारी, शिपाई व लिपिक यांच्या किमान वेतनवाढीचा महत्त्वाचा प्रश्न त्यांनी सोडवला. महाराष्ट्रातील सुमारे ६०,००० कर्मचाऱ्यांच्या वेतनात दुपटीने वाढ करून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

२०१९ मध्ये मराठा आरक्षण प्रश्नामुळे २३० मराठा विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया रखडली होती. दहा दिवसांचे उग्र आंदोलन करून या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देण्यात त्यांनी यश मिळवले.

यशवंतराव चव्हाण, शरद पवार आणि आर. आर. पाटील यांच्या भाषणांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला. यामुळे त्यांचे नेतृत्वगुण अधिक विकसित होत गेले.

यिन व्यासपीठामुळे या गुणांना बळ मिळाले आणि ते यशाची एक-एक शिखरे सर करू लागले. विधानभवन, मंत्रालय, संसद भवन, राष्ट्रपती भवन आणि प्रधानमंत्री कार्यालय येथे प्रत्यक्ष कारभार पाहण्याची संधी त्यांना मिळाली. ते मनःपूर्वक सांगतात – यिन परिवारामुळेच मी घडत गेलो आणि लाखो युवकांचा आवाज बनू शकलो.

हिऱ्याची पारख जोहरीलाच असते, असे म्हणतात. खासदार शरदचंद्र पवार यांनी परमेश्वर इंगोले यांच्या जिद्दीची आणि कार्याची दखल घेत, सदस्यही नसताना त्यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या महाराष्ट्र सचिवपदाची जबाबदारी दिली. येथूनच त्यांच्या राजकीय कारकिर्दीला प्रारंभ झाला.

त्यानंतर संभाजीनगर पक्षनिरीक्षक, कन्नड विधानसभा जिल्हा प्रभारी, वाशिम जिल्हा प्रभारी, प्रदेश सरचिटणीस अशी अनेक जबाबदाऱ्या सांभाळत ते पक्षात सक्रिय राहिले. गेल्या दहा वर्षांपासून राजकारणाच्या माध्यमातून समाजसेवेचे अखंड व्रत त्यांनी जपले आहे.

एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेला हा साधा मुलगा आज सामाजिक आणि राजकीय पटलावर आपल्या जिद्द, मेहनत आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर आपली ठळक मोहोर उमटवत आहे. त्यांच्या कार्याची दखल सातासमुद्रापार अमेरिकेतही घेतली गेली असून, अमेरिकेतील टोलोसा विद्यापीठाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

याशिवाय राज्यस्तरीय छत्रपती संभाजी महाराज पुरस्कार आणि मराठवाडा रत्न पुरस्कारही त्यांच्या नावावर आहेत. परमेश्वर इंगोले अनेक युवकांनी आदर्श घ्यावा असे युवा नेतृत्व आहेत.

असा हा तरुणांना प्रेरणा देणारा परमेश्वर इंगोले यांचा प्रवास. समाजसेवेचे त्यांनी बाळगलेले ध्येय सदैव यशोशिखर गाठो आणि त्यांची राजकीय वाटचालही अधिक प्रगतीपथावर जावो, यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

------------------

**परमेश्वर इंगोले संपर्क क्रमांक**
**9921715103**

## विनाशकाले विपरीत बुद्धी

**वाचक लिहितात**

दोन दिवसापूर्वी पाकिस्तान मधील एका शिया मशिदीत मोठा बॉम्बस्फोट झाला. तेथील परिस्थिती भीषण होती. मशिदीच्या परिसरात मृतदेहांचा खच पडला होता तेव्हा कंधार विमान अपहरण प्रकरणातील प्रमुख सूत्रधार आणि जैश ए मोहम्मदचा आतंकवादी अब्दुल रौफ असगर आणि एक अन्य आतंकवादी अब्दुल रहमान यांनी भारताला लक्ष करण्याच्या धमक्या दिल्या आहेत. तसेच पाकचे सैन्य प्रमुख असीम मुनीर यांनी काश्मीरमधील जनतेच्या मनातील स्वातंत्र्य त्यांना मिळवून देऊ अशी दर्पोक्ती केली.

आतंकवाद्यांच्या धमक्या आणि सैन्य प्रमुखांनी गरळ ओकण्यामागे एकत्रित कट लक्षात येतो आणि काहीतरी मोठी सिद्धता तो निश्चित करत आहे. पाकची भ्याड आतंकवादी आक्रमणे आणि गुप्त कारवाया यांना भारत सणसणीत प्रत्युत्तर देत आहे. फटाके फुटल्या प्रमाणे होणारे बॉम्बस्फोट, सिंध, पश्तून आणि बलुचिस्तान चे स्वातंत्र्य होण्याचे प्रयत्न आणि आतंकवादी कारवायांमुळेच पाक खरंतर जर्जर होत आहे. परंतु पाकिस्तान सुधारण्याची चिन्ह दिसत नाही. श्रीमंत देशांकडे भीक मागून मात्र भारताविरुद्ध जिहाद करू अशी त्यांची स्थिती आहे.

जेव्हा विनाशकाल जवळ येत असतो तेव्हा संबंधितांना आणखीन उत्पात मजवण्याची बुद्धी होते. पाकिस्तान देखील आता या स्थितीला पोहोचला आहे. भारतीय सैन्य आता पूर्ण शक्तीनिशी पाकचा भूगोल आणि इतिहास पालटण्यासाठी सज्ज झाला आहे पाकची एक चूक राष्ट्राला नामशेष करणारी ठरणार आहे.

■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.



# हातापायात सुई टोचल्यासारखे
## दुखतंय, हा आजार असू शकतो !

जर तुमची शुगर कंट्रोलमध्ये आहे. डायबिटीजचा आजार देखील डिटेक्ट झालेला नाही. तरीही नसांमध्ये दुखणे सुरु असेल हातापायाला मुंग्या येत असतील या मागची कारण समजून घेणे गरजेचे आहे. डॉक्टरांच्या मते जर अशा प्रकारची समस्या असेल तर याच कारण पेरिफेरल न्यूरोपॅथी असते.

मॅक्स साकेतच्या न्यूरोसर्जरी विभागाचे असोसिएट डायरेक्टर डॉ. दलजीत सिंह यांनी सांगितले की पेरिफेरल न्यूरोपॅथी या आजारात मेंदूतून आणि स्पायनल कॉर्डमधून बाहेर जाणाऱ्या नसांवर परिणाम होतो. जर कोणतीही गडबड या नसांमध्ये झाली तर व्यक्तीच्या पायात आणि हातात मुंग्या आल्यासारखे होते किंवा सुन्नपणा आणि बधिरपणा जाणवतो. या तक्रारी त्या लोकांमध्ये देखील असतात ज्यांना डायबिटीज नाही किंवा ज्यांची शुगर लेव्हल नियंत्रणात आहे.

**पेरिफेरल न्यूरोपॅथी म्हणजे काय?**

पेरिफेरल न्यूरोपॅथीचे सर्वात मोठे कारण म्हणजे शरीरात व्हिटामिन्स बी १२ ची कमतरता असणे होय याशिवाय जर स्पाईनचा कोणताही आजार, चुकीच्या पद्धतीने बसणे वा ऑटोइम्यून आजाराने देखील नसांना नुकसान पोहचू शकते. सर्वसाधारणपणे पाहिले गेले आहे की जे लोक डेस्क जॉब करतात आणि रोज व्यायाम करत नाहीत. त्यांना देखील ही समस्या होते.

आधी हा प्रकार साधारण ५० ते ६० वर्षांहून अधिकच्या लोकांमध्ये पाहायला मिळायचा. परंतू आता ४० आणि ३० वयोगटातील लोकांना देखील हा आजार होऊ लागला आहे असे डॉ. दलजीत सांगतात. मात्र, हा आजार काही अचानक होत नाही. हा आजार होण्याच्या आधी शरीरात अनेक प्रकारची लक्षणे पाहायला मिळतात. ज्यांना नजरअंदाज करु नये. खास करुन ज्यांना डायबिटीज आहे त्यांनी तर काळजी घ्यायला हवी.

**पेरिफेरल न्यूरोपॅथीची लक्षणे काय?**

हाता पायांमध्ये सुन्नपणा जाणवणे, पायांच्या तळव्यात जळजळ होणे, चालताना तोल जाणे, हातापायात कमजोरी, वस्तू पकडताना अडचण होणे.

**उपाय कसा केला जातो?**

जर तुमच्या शरीरात व्हिटामिन्सची कमी आहे तर यासाठी तुम्हाला औषधे दिली जातात. जर मणक्याच्या संबंधीत त्रास असेल फिजिओथेरपी, एक्सरसाईज, आणि औषधे चालतात. वेदना नियंत्रणासाठी न्यूरोपॅथिक पेनची औषधे दिली जातात. या प्रकारे रुग्णावर उपचार केला जातो.

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## अरे किती हे पुतळे?

पुतळे उभारण्याचा नेत्यांना
छंद मोठा भारी
पण त्यांच्या संरक्षणाची
घेइना समाज जवाबदारी..

पुतळे उभारून करती
लोक कृतज्ञता व्यक्त
त्यांचे गुण स्विकारण्यात
मात्र दिसते सारे अलीप्त ..

जात धर्म राजकारणातून
पुतळ्यांची संख्या वाढते
मंत्र्याद्वारे हारार्पण करतांना
भौ हाताला कळ लागते ...

# पाठलागनंतर रस्त्यावर रेती सांडवित तस्करी करणारा ट्रक पसार





## महसूल विभागाची धडक कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी ( दि.12 )**– तालुक्यात वाढत्या अवैध रेती तस्करीविरोधात महसूल विभागाने पहाटे धाडसी कारवाई करत मोठा प्रकार उघडकीस आणला. परतवाडा मार्गावरून अंजनगावकडे येणारा रेतीने भरलेला डंपर अडवण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वाहन न थांबवता भरधाव वेगाने पळ काढला.

महसूल विभागाच्या भरारी पथकाने तत्काळ पाठलाग सुरू केला. मात्र, चालकाने चलत्या वाहनाचे मागील फाटक उघडून अंदाजे 8 ते 10 ब्रास रेती रस्त्यावर सांडत अकोट रोडकडे पलायन केले. या प्रकारामुळे काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

## महसूल अधिकाऱ्यांना धक्काबुक्की

ग्राम महसूल अधिकारी योगेश सुधाकर लंगडे (विहीगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सकाळी सुमारे 5.30 वाजता उत्सव नाक्याजवळ भरारी पथक तैनात असताना संशयित डंपर आढळला. वाहन थांबवण्याचा इशारा देऊनही चालकाने दुर्लक्ष केले. गौमाता दूध डेरी परिसरात वाहन थांबवून रेती वाहतुकीचा पास मागितला असता चालकाकडे कोणतीही वैध परवानगी आढळली नाही. वाहन तहसील कार्यालयात लावण्यास सांगितल्यावर चालकाने महसूल अधिकारी लंगडे यांना धक्काबुक्की करून वाहन पळवून नेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेमुळे मागील वाहनांना अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला होता.

## ट्रकसोबत स्विफ्ट कार; मालकांची नावे समोर

घटनेदरम्यान ट्रकसोबत एमएच 27/ डीई 5785 क्रमांकाची स्विफ्ट कार असल्याचे समोर आले. संबंधित कारचा चालक अविनाश जाधव असल्याची माहिती मिळाली आहे. तक्रारीनुसार, ट्रक व कारचे मालक प्रज्वल माथनकर व यश राजगुरे (रा. मोर्शी) असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ट्रकच्या नंबर प्लेटवर तेल लावल्यामुळे वाहन क्रमांक स्पष्टपणे नोंदवता आला नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## शहानूर पुलापासून तहसीलदार निवासस्थानापर्यंत रेतीचा सडा

पाठलागादरम्यान मोठ्या प्रमाणात रेती सांडल्यामुळे शहानूर पुलापासून तहसीलदारांच्या निवासस्थानापर्यंत रस्त्यावर रेतीचा थर पसरला होता. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन पंचांसमक्ष पंचनामा करण्यात आला. जेसीबीच्या साहाय्याने सांडलेली रेती गोळा करून तहसीलदारांच्या तोंडी आदेशानुसार निवासस्थानासमोर ठेवण्यात आली.

## पंचनामा पूर्ण; पोलीसांत लेखी तक्रार

महसूल अधिकारी लंगडे व काटकर यांच्या उपस्थितीत पंच निलेश भोंडे, श्रीकृष्ण सुने, जीवन चहाटे, मोहन ओडे व रामदास कोरे यांच्या साक्षीने पंचनामा पार पडला. यानंतर अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून संबंधित ट्रक चालक व मालकांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हे दाखल केल्याचे समजते.

## नागरिकांमध्ये संताप

अवैध रेती तस्करीमुळे शासनाचा महसूल बुडत असून सार्वजनिक रस्त्यांची हानी व अपघाताचा धोका वाढत आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या धक्कादायक प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.आता संबंधित वाहनांचा शोध घेऊन प्रशासन कोणती ठोस कारवाई करते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# 57 युनिटवर 18 हजारांचे बिल

## चांदूर बाजार महावितरणचा गोंधळ उघड

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि. 12 )**- चांदूर बाजार महावितरण उपविभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना जसापूर येथील रहिवासी आनंद दयारामजी मेश्राम यांच्या प्रकरणामुळे समोर आली आहे. वापर नसलेल्या घराला अवघ्या 57 युनिटवर तब्बल 18 हजार 140 रुपयांचे वीजबिल आकारण्यात आल्याने संबंधित ग्राहकाला मोठा आर्थिक धक्का बसला आहे.

आनंद दयारामजी मेश्राम यांचे माधान येथे घर असून त्या ठिकाणी कोणीही राहत नाही. 353310032638 ग्राहक क्रमांक असलेल्या डिसेंबर 2025 मध्ये मीटरवर 57 युनिट चालू रीडिंग आणि केवळ 2 युनिट वापर दर्शवत 170 रुपयांचे बिल आले होते. संबंधितांनी ते बिल वेळेवर भरले. मात्र फेब्रुवारी महिन्यात अचानक 18 हजार 140 रुपयांचे बिल आल्याने ते चकित झाले.






माझे माधान या ठिकाणी घर असून त्या ठिकाणी कोणीच राहत नाही. तरी देखील मला 18140 बिल देण्यात आले. महावितरण या दुर्लक्षित कारभार मुळे हा प्रकार घडला असून यावर दोषीवर कारवाई करणे गरजेचे आहे. आणि मला न्याय मिळावा ही अपेक्षा आहे.

**आनंद दयारामजी मेश्राम ग्राहक**

ग्राहकाच्या म्हणण्यानुसार, मीटरवर सध्या 57 युनिट रीडिंग दिसत असताना बिलावर 1002 चालू रीडिंग आणि 945 युनिट वापर दाखवण्यात आला आहे. प्रत्यक्ष वापर नसताना इतका प्रचंड वापर दाखवण्यात आल्याने बिलिंग प्रक्रियेतील गंभीर त्रुटी उघड झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. एकीकडे 'ग्राहकांचे हित हेच महावितरणचे ध्येय' असल्याचे सांगितले जाते; मात्र अशा प्रकारांमुळे ग्राहकांना कार्यालयीन दिरंगाई आणि हेलपाटे सहन करावे लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. संबंधितांनी महावितरणकडे तक्रार दाखल केली असून बिल दुरुस्त करून न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करून बिलिंगमधील त्रुटी दुरुस्त करण्यात येणार का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# जीएमसीच्या नवीन शासकीय जमिनीचा ताबा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )** - अलियाबाद कोंडेश्वर (वडद) येथील 11.29 हेक्टर शासकीय जमिनीचा अंतिम ताबा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी वैद्यकीय शिक्षण विभागाकडे देण्यात आला आहे. महसूल विभागाने 4 फेब्रुवारी 2024 रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. या निर्णयामुळे 100 विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असलेले नवीन वैद्यकीय महाविद्यालय व 430 खाटांचे आधुनिक रुग्णालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे पश्चिम विदर्भातील आरोग्य व्यवस्थेला मोठा संजीवनी मिळणार आहे. शासन निर्णयानुसार, या जागेवर वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना व त्यासंबंधी रुग्णालयाचे बांधकाम येत्या तीन वर्षांत पूर्ण करणे अपेक्षित आहे. या निर्णयाची विशेषता म्हणजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत निर्देश दिले होते. सध्या जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. याविषयी वैद्यकीय शिक्षण विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सहकार्याने जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्या शासकीय रुग्णालयाच्या जागेत वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. या महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत सात वर्षांत पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे.

महसूल विभागाच्या निर्णयानुसार, अलियाबाद कोंडेश्वर (वडद) येथील 11.29 हेक्टर ई–क्लास जमिनीचा ताबा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. यावर तीन वर्षांच्या आत प्रकल्प कार्य सुरू करणे बंधनकारक ठरले आहे. शासनाने जमीनीच्या वापराबाबत काही महत्त्वाच्या अटी घातल्या आहेत. महसूल विभागाच्या परवानगीशिवाय या जमिनीचा विक्री, देणगी, गहाण किंवा कोणत्याही खासगी–सार्वजनिक भागीदारीत हस्तांतरण करणे शक्य होणार नाही. वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामासाठी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या निर्णयानुसार, 5 फेब्रुवारी 2024 रोजी शासनाने मौजा अलियाबाद कोंडेश्वर (वडद) येथील 11.29 हेक्टर ई–क्लास जागेवर महाविद्यालय बांधण्यास मंजुरी दिली होती. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने राइट्स या कंपनीला या इमारतीच्या बांधकामाचे कंत्राट दिले होते. तथापि, दोन वर्षांपासून प्रत्यक्ष बांधकामाला सुरूवात करण्यात आलेली नाही.

## मैनाबाई महादेवराव यावलकर यांचे निधन



**हिवरखेड** - येथील मोरोती देवस्थानचे कोषाध्यक्ष तथा प्रतिष्ठित नागरिक महादेवराव बैरामजी यावलकर यांच्या पत्नी मैनाबाई महादेवराव यावलकर यांचे मंगळवार, दिनांक 10 फेब्रुवारी 2026 रोजी वयाच्या 85 व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मैनाबाई यावलकर या शांत, मनमिळावू व कुटुंबवत्सल स्वभावामुळे परिचित होत्या. त्यांच्या पार्थिवावर निर्मिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, तीन सुना, दोन मुली, दोन जावई, नातू व नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे.

## रमेशराव पोकळे यांचे निधन



**अंजनगाव बारी** - येथील समाजाचे सामाजिक कार्यकर्ते तसेच श्रीकृष्ण लीला उत्सव मंडळाचे माजी सदस्य रमेशराव मारोतराव पोकळे (62) व्या वर्षी अल्प आजाराने शनिवार दि. 7 रोजी सकाळी अकरा वाजता दु:खद निधन झाले. त्यांच्यावर अंजनगाव बारी येथील हिंदू स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात तीन मुले, एक भाऊ व नातूपंतू असा बराचसा आप्त परिवार आहे.

## जाहीर नोटीस

श्री. एस.बी. बहिरट दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी.क्र. १९/२०२६ ने.ता. ०५/०३/२०२६

शेख वजीर शेख रशीद वय ४८ वर्षे, धंदा– मजुरी,
रा. कुरेशीनगर, सुर्जी, ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ....... अर्जदार

विरूद्ध

निरंक .......गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे अ. रशीद शे. अमीर यांचा दिनांक २४/१२/२०१८ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच आई नामे हलीमा बी. अ. रशीद यांचा दिनांक ०८/०६/२०१८ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आजी नामे हाजरा बी शे. अमीर यांचा बरेच वर्षापूर्वी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

१) अब्दुल बशीर अब्दुल रशीद वय ६४ वर्षे, मुलगा, २) अब्दुल नजीर अब्दुल रशीद, वय ५६ वर्षे, मुलगा, ३) मोहम्मद शब्बीर अब्दुल रशीद वय ४७ वर्षे, मुलगा, ४) शेख वजीर अब्दुल रशीद वय ४८ वर्षे, मुलगा, ५) अब्दुल मजीद अब्दुल रशीद वय ४५ वर्षे, मुलगा.

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

अ. रशीद शे. अमीर, हलीमा बी अ. रशीद हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारेखपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणालाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

श्रीमती एस.बी. राठोड, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी.क्र. ५८७/२०२६ ने.ता. ०२/०३/२०२६

प्रकाश रामकृष्ण नवले, वय ४१ वर्षे, धंदा– मजुरी,
रा. मुऱ्हा, ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ....... अर्जदार

विरूद्ध

निरंक .......गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे रामकृष्ण नारायण नवले यांचा दिनांक १७/०८/२०१७ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आजी नामे अन्नपूर्णा नारायण नवले ही बरेच वर्षापूर्वी मयत झाली आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

१) सुनिता रामकृष्ण नवले, वय ५३ वर्षे, पत्नी, २) योगिता योगेश अडगोकार, वय ४३ वर्षे, मुलगी, ३) प्रकाश रामकृष्ण नवले वय ४१ वर्षे, मुलगा, ४) मंगला राहुल भोरखडे वय ३९ वर्षे, मुलगी

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

रामकृष्ण नारायण नवले हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारेखपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणालाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

श्रीमती एस.बी. बहिरट, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी.क्र. ५८६/२०२६ ने.ता. १७/०२/२०२६

ईरफान शाह रशीद शाह वय ३७ वर्षे, धंदा– मजुरी,
रा. मोमीनपुरा, अंजनगाव सुर्जी, ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ....... अर्जदार

विरूद्ध

निरंक .......गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे रशीद शाह मुनीर शाह यांचा दिनांक १९/०३/२०२५ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आई नामे अमीना बी रशीद शाह यांचा दिनांक १५/१२/२०२४ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आजी नामे ताज बी मुनीर शाह ही बरेच वर्षापूर्वी मयत झाली आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

१) जाबीर शाह रशीद शाह, वय ४१ वर्षे, मुलगा, २) ईरफान शाह रशीद शाह, वय ३७ वर्षे, मुलगा.

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

रशीद शाह मुनीर शाह, अमीना बी रशीद शाह हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारेखपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणालाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

श्रीमती एस.बी. बहिरट, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी.क्र. ५८८/२०२६ ने.ता. ०४/०३/२०२६

रेहाना बानो बिस्मील्ला खा, वय ४१ वर्षे, धंदा– घरकाम,
रा. शाहीन कॉलनी, अकोट ता. अकोट जि. अमरावती ....... अर्जदार

विरूद्ध

निरंक .......गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे अविवाहित भाऊ नाते सैय्यद अल्ताफ अली सैय्यद मेहमुद अली यांचा दिनांक ०९/०६/२०२३ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराचे वडील नामे महेमुद अली बासीत अली यांचा दिनांक २७/०८/२०२४ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

१) अख्तरबी महेमुद अली वय ७९ वर्षे, आई, २) फरजाना बानो मुर्तुजा खान वय ४९ वर्षे, बहिण, ३) रेहाना बानो बिस्मील्ला खा वय ४२ वर्षे, बहिण, ४) शबाना बानो नासीर खॉ, वय ४० वर्षे, बहिण, ५) नईमा बी मेहमुद अली वय ३७ वर्षे, बहिण.

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

सैय्यद अल्ताफ अली सैय्यद मेहमुद अली हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारेखपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणालाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

श्रीमती एस.बी. राठोड सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी.क्र. ५८५/२०२६ ने.ता. १२/०३/२०२६

निकीता प्रशांत काळे लग्नानंतरचे नाव
निकीता विलासराव सदार लग्नापूर्वीचे नाव, वय ३१ वर्षे, धंदा– मजुरी
रा. विहीगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ... अर्जदार

विरूद्ध

निरंक .......गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडिल नामे विलास मधुकर सदार यांचा दिनांक २९/०४/२००० रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आई नामे शीला विलास सदार यांचा दिनांक २१/०५/२०१८ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराचे अविवाहित भाऊ नामे कुलदीप मधुकर सदार यांचा दिनांक २९/०९/२०२५ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आजी नामे त्रीवेणीबाई मधुकर सदार यांचा दिनांक ०५/०४/२००६ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

१) निकीता प्रशांत काळे लग्नानंतरचे नाव वय ३१ वर्षे, मुलगी
निकीता विलासराव सदार लग्नापूर्वीचे नाव

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

विलास मधुकर सदार, शीला विलास सदार हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारेखपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणालाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

श्रीमती एस.बी. राठोड सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी.क्र. १४/२०२६ ने.ता. ११/०३/२०२६

फिरोज शाह जबी शाह वय ४२ वर्षे, धंदा– मजुरी
रा. कुरेश नगर, अंजनगाव सुर्जी ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती ... अर्जदार

विरूद्ध

निरंक .......गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची विवाहित बहिण नामे सईदा बानो नासीर शाह यांचा दिनांक २७/१०/२०२१ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच वडील नामे जबी शाह लाल शाह यांचा दिनांक ०७/०४/२०२० रोजी मृत्यू झाला आहे. आई नामे शाकेरूनबी जबी शाह ही बरेच वर्षापूर्वी मयत झाली आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

१)जाहीर शाह जबी शाह, वय ६१ वर्षे, भाऊ, २) जमीर शाह जबी शाह वय ५७ वर्षे, भाऊ, ३) जमशिद शाह जबी शाह, वय ५५ वर्षे, भाऊ, ४) फिरोज शाह जबी शाह वय ४२ वर्षे, भाऊ, ५) कलाम शाह जबी शाह, वय ४१ वर्षे, भाऊ, ६) सादीया कौसर शकील अहेमद शाह वय ३८ वर्षे, बहिण, ७) नाजीया कौसर आसीफ शाह वय ३६ वर्षे, बहिण, ८) सालेहा फिर्दोस जबी शाह वय ३० वर्षे, बहिण, ९) नासीर शाह सलाम शाह, वय ५८ वर्षे, पती.

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

गोपाळराव रामचंद्र भांबुरकर हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारेखपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणालाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

श्री. एस.बी. बहिरट, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एस.जे.सी.क्र. ६१४/२०२५ ने.ता. २६/०२/२०२६

**प्रकाश गोपाळराव भांबुरकर वय ५५ वर्षे, धंदा– मजुरी**
**रा. विहीगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती ............. अर्जदार**

**विरूद्ध**

**निरंक ........... गैरअर्जदार**

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नाते गोपाळराव रामचंद्र भांबुरकर यांचा दिनांक ३०/०४/२०२५ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आजी नामे जयवंताबाई रामचंद्र भांबुरकर ही बरेच वर्षापूर्वी मयत झाली आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहे.

१) इंदू गोपाळराव भांबुरकर, वय ८४ वर्षे, पत्नी, २) दिलीप गोपाळराव भांबुरकर, वय ६१ वर्षे, मुलगा, ३) दिनेश गोपाळराव भांबुरकर, वय ५९ वर्षे, मुलगा, ४) प्रकाश गोपाळराव भांबुरकर, वय ५५ वर्षे, मुलगा, ५) धनराज गोपाळराव भांबुरकर वय ५४ वर्षे, मुलगा.

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

गोपाळराव रामचंद्र भांबुरकर हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारेखपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणालाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील ( श्रीमती एस.बी. राठोड ) सह. दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. २४३/२०२४ ने.ता. ०२/०८/२०२५

अ. रहिम शेख इब्राहिम वय ७० वर्षे, धंदा– मजुरी, रा. काजीपुरा, अंजनगांव सुर्जी,
ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती .... अर्जदार

**विरूद्ध**

निरंक ....... गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील नामे शे. इब्राहिम शेख वजीर यांचा दिनांक २४/०९/२००० रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आई नामे शरीफा बी. शे. इब्राहिम यांचा दिनां १७/०९/१९६८ रोजी झाला आहे. तसेच विवाहित बहिण नामे हनिफा बी. अ. रहिम यांचा दिनांक २३/११/२०१० रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

१) अब्दुल सलाम शेख इब्राहिम, वय ७९ वर्षे, मुलगा, २) अब्दुल रहेमान शेख इब्राहिम, वय ८१ वर्षे, मुलगा ३) कलीमा बी रसुल खान, वय ६५ वर्षे, मुलगी, ४) अ. रहिम शे. इब्राहिम, वय ७० वर्षे, मुलगा, ५) सलीमा बी. मोहम्मद शब्बीर, वय ६२ वर्षे, मुलगी, ६) अब्दुल कलाम शेख इब्राहिम, वय ६० वर्षे, मुलगा, ७) हनिफा बी अ. रहिम, मयत, मुलगी, अ) नसरीन परवीन मोहम्मद नाजीम, वय ४९ वर्षे, नात, ब) शहेनाज बानो मोहम्मद साबीर, वय ४८ वर्षे, नात, क) मोहम्मद आरीफ अ. रहिम, वय ४४ वर्षे, नातु, ड) मोहम्मद शारीफ अ. रहिम वय ४३ वर्षे नातू.

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

शे. इब्राहिम शेख वजीर, शरीफा बी. शे. इब्राहिम हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारेखपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणालाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६/०६/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती**

RNINO-46975/1985 Mahasagar Amravati

Printed published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no 9518934504 Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन. आय. नोंदणी क्र. ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक



# बालांगण



## शक्तीशाली युरेनियम

माहिती खनिजांची


युरेनियम हा एक महत्त्वाचा पण थोडासा वेगळा खनिज धातू आहे. हा धातू जमिनीत खडकांच्या स्वरूपात सापडतो. विशेषत: काही खडक करोडो वर्षे जुने आहेत. युरेनियम काही ठिकाणी माती आणि नदीच्या तलावांमध्येदेखील आढळतो. त्याचा रंग पांढरा ते हिरवट तपकिरी असतो. युरेनियम दिसायला साधे असले तरी पण त्याच्यात खूप मोठी शक्ती लपलेली आहे. त्यामुळेच युरेनियमला जगभरात फार महत्त्व आहे. युरेनियम भारतात काही ठराविक भागात सापडते. भारतात झारखंडमधील जादुगुडा या ठिकाणी युरेनियमचा साठा आहे. याशिवाय आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि राजस्थानमध्येही युरेनियमचे साठे आढळतात. जगात कॅनडा, ऑस्ट्रेलिया, कझाकस्तान आणि रशिया हे देश युरेनियमसाठी ओळखले जातात. जमिनीतून मिळणारे युरेनियम थेट वापरता येत नाही. ते खडकांमध्ये मिसळलेले असते. खाणींतून खडक बाहेर काढून ते बारीक केले जातात. नंतर वेगवेगळ्या प्रक्रियांद्वारे त्यातील युरेनियम वेगळे केले जाते. या प्रक्रियेत खूप काळजी घ्यावी लागते. कारण युरेनियम चुकीच्या पद्धतीने हाताळले तर ते धोकादायक ठरू शकते. त्यामुळे युरेनियमचे छोटे तुकडे हाताळताना वैज्ञानिक विशेष साखळीचा वापर करतात. युरेनियमचा सर्वात महत्त्वाचा वापर वीज निर्मितीसाठी होतो. अणुऊर्जा केंद्रांमध्ये युरेनियमपासून मोठ्या प्रमाणात वीज तयार केली जाते. थोडेसे युरेनियम वापरून खूप वीज मिळू शकते. त्यामुळे कोळसा किंवा पेट्रोलियमपेक्षा युरेनियम अधिक शक्तिशाली मानले जाते. काही ठिकाणी युरेनियमचा वापर संशोधनासाठी आणि वैद्यकीय क्षेत्रातही केला जातो. युरेनियम–२३५ हा प्रकार अणुऊर्जेत उपयोगी आणि शक्तिशाली असतो.युरेनियमचा वापर जपून करावा लागतो. कारण त्यातून निघणारी ऊर्जा योग्य नियंत्रणात नसेल तर ती नुकसान करू शकते. म्हणून अणुऊर्जा केंद्रांमध्ये कडक नियम पाळले जातात आणि प्रशिक्षित लोकच तिथे काम करतात.

एकूणच युरेनियम हा अत्यंत शक्तिशाली, महत्त्वाचा आणि संवेदनशील असा खनिज धातू आहे. जबाबदारीने वापर केल्यास त्याचा देशाच्या विकासासाठी चांगला उपयोग करता येतो.

## महत्त्वपूर्ण सातपुडा पर्वतरांग

ओळख पर्वतांची

सातपुडा पर्वतरांग ही महाराष्ट्रातील आणि मध्य प्रदेशच्या काही भागात पसरलेली एक महत्त्वाची पर्वतरांग आहे. या पर्वतरांगेची सुरुवात महाराष्ट्रातील भंडारा आणि नागपूर परिसरातून होते आणि मध्य प्रदेशाच्या छिंदवाडा, बुरहानपूर आणि अंर्तगत भागांतून पुढे सरकते. सातपुडा पर्वतरांग ही सह्याद्री पर्वतरांग आणि विंध्य पर्वतरांगेशी जोडलेली असून ती मध्य भारतातील भूगोलाचा महत्त्वाचा भाग मानली जाते. सातपुडा पर्वतरांग मध्यम उंचीची असून तिची सरासरी उंची सुमारे ९०० ते १३०० मीटर आहे. त्यामुळे येथील शिखरे सहसा १०००–१३०० मीटर उंचीची आहेत. धिंगणी, महादेवगड या शिखरांवरून परिसराचे विस्तृत निसर्गदृश्य दिसते. काही डोंगर सपाट माथ्याचे दिसतात. तर काही खोल दऱ्यांनी वेढलेले आहेत. नर्मदा, तापी आणि पेन या नद्या या पर्वतरांगेतून उगम पावतात. नर्मदा नदी पश्चिमेकडे वाहते तर पेन आणि तापी पूर्वेकडे वाहते. त्यामुळे सातपुडा पर्वतरांग भारतातील जलसंपत्तीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. या भागात दाट जंगले आहेत. साग, साल, बांबू यांसारखी झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात. या जंगलांमध्ये वाघ, चित्ता, हत्ती, अस्वले, हरणे यासारखे प्राणी राहतात. त्यामुळे हा परिसर जैवविविधतेसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. काही ठिकाणी राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये आहेत. ताडोबा आणि पेंच ही पर्यटकांना आणि संशोधकांना आकर्षित करणारी अत्यंत महत्वाची अभयारण्ये आहेत. गवे आणि वाघ या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आढळतात. इतिहासाच्या दृष्टिकोनातूनही सातपुडा पर्वतरांग महत्त्वाची आहे. प्राचीन काळी व्यापार, प्रवास आणि सामरिक दृष्ट्या हा मार्ग महत्त्वाचा होता. रस्त्यांवर आणि घाटांवर अनेक प्राचीन किल्ले आणि वस्तीचे अवशेष आढळतात. ही पर्वतरांग उत्तर आणि दक्षिण भारताच्या संस्कृती, जीवनशैली आणि भाषेत फरक निर्माण करण्यास कारणीभूत ठरली. आजही सातपुडा पर्वतरांग परिसरात शेती, खाणकाम, वने आणि पर्यटन महत्त्वाचे आहेत. या भागात लोखंड, मँगनीज, बॉक्साइट यांसारखी खनिजंही सापडतात. सातपुडा पर्वतरांग हा निसर्ग, इतिहास, भूगोल आणि प्राणीसंपत्ती यांचा संगम आहे आणि महाराष्ट्र तसेच मध्य भारतासाठी खूप महत्त्वाचा आहे.



## का वाटते भीती?

रंजक विज्ञान

आपल्याला कधी कधी अचानक भीती वाटते. कधीतरी रात्री झोपेत आवाज ऐकून आपण दचकून जागे होतो किंवा उंच बिल्डिंगमधून खाली बघताना घाबरतो. ही भीती ही आपल्या मेंदूची नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. ती आपल्याला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करते. भीतीमुळे आपल्या मेंदूत आणि शरीरात धोका आहे असा संदेश देणारी भावना निर्माण होते. मेंदूतल्या एका भागाला अमिग्डाल म्हणतात. काहीतरी धोकादायक दिसते तेव्हा अमिग्डाला लगेच सक्रिय होते आणि शरीराला लढा किंवा पळा अशी सूचना देते. त्यामुळे हृदय वेगाने धडधडायला लागते. हात–पाय थंड पडतात. डोळे मोठे होतात. भीती निर्माण होण्यामागे विशेष हार्मोन्स काम करतात. अॅड्रेनालीन आणि नॉरअॅड्रेनालीन या संप्रेरकांमुळे शरीर आणि मेंदू सतर्क राहतो. त्यामुळे हृदयाची धडधड वाढते आणि लक्ष केंद्रित होते. कॉर्टिसॉलहे संप्रेरक शरीराला ऊर्जा तयार करून तणावावर ताबा मिळवते. नंतर थोडी शांतता आणण्यासाठी सेरोटोनिनसारखी संप्रेरके सक्रिय होतात. त्यामुळे मेंदूत संतुलन राखले जाते.

खराखुर्या धोक्यामुळेच भीती वाटते असे नाही. कधी कधी फक्त कल्पना किंवा चित्रपटातील गोष्टींमुळेदेखील भीतीची भावना निर्माण होते. अंधार दिसल्यावर तिथे भूत असेल या कल्पनेने आपण घाबरतो. परंतु तसे काही नसतेच.



मग शरीर तातडीने प्रतिक्रिया देते. कारण मेंदू आधीच सावध असतो. भीती आपल्याला शिकवतेही. आपण उंच इमारतीवर चढलो आणि घाबरलो, तर पुढच्या वेळी आपण अधिक सावधपणे चढतो. एखाद्या जंगलात फिरत असताना वाघ दिसल्यास आपण पटकन मागे जातो. अशा परिस्थितीत भीती आपले संरक्षण करते.

कधी कधी भीती मजेदारही ठरते. मित्रांबरोबर बसून भुतांच्या गोष्टी ऐकून आपल्याला भीती वाटते. किंवा घरातील अंधाऱ्या कोपऱ्यांमध्ये खेळताना आपण लपतो तेव्हा थोडीशी भीती वाटते. पण ही भीतीमुळे कधीकधी आपल्याला उत्साह वाटतो. मजा वाटते. ही भीती खेळ खेळायला भाग पाडते आणि मेंदू सतर्क ठेवते.भीती ही फक्त वाईट गोष्ट नाही. ती आपल्याला सुरक्षित ठेवते. शिकवते. आपण योग्य पद्धतीने भीती ओळखू शकलो तरतिची आपल्याला मदतही होते. हार्मोन्स योग्य पद्धतीने काम करतात, तेव्हा मेंदू आणि शरीर आपल्याला सावध करतात आणि आपल्याकडून योग्य प्रतिक्रिया घडवून आणतात.



## पाळणार कोणत्या जातीचं मांजर?

नॉलेज अपडेट

तुम्हाला घरात एखादा प्राणी पाळायला आवडेल का? त्यातही मांजर जास्त गोंडस वाटतं का? मांजरं प्रेमळ, हुशार आणि स्वावलंबी असतात. कुत्र्यांच्या तुलनेत शांत असतात. त्यांना सांभाळण्यासाठी फार खर्च येत नाही. स्वच्छतेची काळजी आपली आपण घेतात. मांजर घरात एकटंही राहू शकतं. त्यामुळे कुत्रं पाळण्यापेक्षा मांजर पाळणं जास्त सोयीचं असतं. भारतात मांजरांच्या वेगवेगळ्या प्रजाती आहेत. आज या प्रजातींची माहिती घेऊ या...

* हिमालयन मांजर ही सर्वसाधारणपणे आढळणारी प्रजाती आहे. या प्रजातीला 'कलरपॉईंट पर्शियन; असंही म्हटलं जातं. या प्रजातीच्या मांजरांच्या अंगावर खूप केस असतात. या मांजरांचे डोळे निळे असतात. त्यांचा रंग पांढराशुभ्र असतो. काहींचा रंग राखाडी, क्रीम किंवा ब्राऊनही असू शकतो.

* 'मुंबई मांजर' ही मांजराची एक प्रजाती आहे. या जातीचं मांजर काळपट रंगाचं असतं. त्यांचे डोळे सोनेरी असतात. काळ्या रंगामुळे ते उठून दिसतं.

* 'सियामेसे' ही मांजराची दक्षिण आशियातली प्रजाती आहे. या मांजरांचं मूळ चीनमधल्या शांघायमध्ये आहे. या प्रजातीतील मांजरांचं शरीर पिळदार असतं.

* 'मैने कून' ही पृथ्वीवरची मांजराची सर्वात प्राचीन प्रजाती आहे. ही मांजरं परिस्थितीशी सहजतेने जुळवून घेतात. कोणत्याही वातावरणात ते स्वत:ला सामावून घेतात. ही प्रजाती स्वभावाने शांत असते.

* 'पर्शियन मांजर' हॉलिवूडपटांमध्ये दिसतं. या मांजरांच्या अंगावर खूप केस असतात. ते खूप गोंडस दिसतात. या मांजरांकडे जास्त लक्ष द्यावं लागतं.

* 'द अमेरिकन बॉबटेल' ही मांजराची प्रजाती प्रसिद्ध आहे. या मांजराचं शेपूट झुबकेदार असतं. ते सहजतेने नव्या वातावरणाशी जुळवून घेतात. खेळकर स्वभावासाठी ते ओळखले जातात.


* ठिपकेवाली मांजरंही खूप गोड दिसतात. त्यांच्या अंगावर करड्या रंगाचे ठिपके किंवा पट्टे असतात. मांजरांची ही प्रजाती प्रेमळ असते.

मांजर पाळताना विचार करुन प्रजातीची निवड करा. या सोबत्यामुळे तुम्हाला एक चांगला सवंगडी मिळेल याची खात्री बाळगा.

## नक्षी नेल पॉलिशची

करून तर पाहा

तुमच्याकडे नेल पॉलिशच्या रंगीबेरंगी बाटल्या असतील. या नेल पॉलिशचा वापर करून तुम्ही भन्नाट कलाकृती साकारू शकता. नेल पॉलिश मार्बलिंग हा प्रकार तुम्ही नक्की ट्राय करा. यासाठी काय करायचं हे पाहु या...



साहित्य : रंगीबेरंगी नेल पॉलिश, पसरट ट्रे, पाणी, प्लेन पेपर, नेल पॉलिश रिमूव्हर, प्लास्टिकचे ग्लोव्हज, टूथपिक, पॉपसिकल स्टिक्स इत्यादी.

कृती: सर्वात आधी पसरट ट्रेमध्ये पाणी घाला. या पाण्यात कागद बुडायला हवा. कामाला सुरूवात करण्यापूर्वी प्लास्टिकचे ग्लोव्हज असतील घाला. त्यातूनही हातांना नेल पॉलिश लागलं तर ते काढण्यासाठी रिमूव्हरचा वापर करता येईल. आता खरी गंमत आहे दोस्तांनो... नेल पॉलिश मार्बलिंग ही भन्नाट कलाकृती आहे. ती करण्यासाठी विविध रंगांचं नेल पॉलिश घ्या. सगळ्या बाटल्या ट्रे मधल्या पाण्यात ओता. ही कृती झटपट करा. आधी फिकट रंगाचं नेल पॉलिश घ्या. मग गडद रंगांची निवड करा. टूथपिकच्या मदतीने नेल पॉलिश पाण्यात पसरवून घ्या. आता पेपर पाण्यात बुडवा. काही सेकंद ठेवा आणि लगेच बाहेर काढा. कागदावर नेल पॉलिशची नक्षी उमटलेली दिसेल. पाण्यावर तरंगणारं नेल पॉलिश पॉपसिकल स्टिकच्या मदतीने बाजूला करा. कागद वाळू द्या. कागदावर उमटलेली रंगीबेरंगी नक्षी खूप छान दिसेल.

## झाडांच्या जगात

फन टाईम

'झाडं लावा, झाडं जगवा' हे वाक्य तुम्ही बरेचदा ऐकलं असेल. झाडं पर्यावरणाची रक्षक असतात. हवेतला कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेऊन वातावरणात ऑक्सिजन सोडण्याचं महत्त्वाचं काम झाडं करतात. म्हणूनच जास्तीत जास्त झाडं लावायला हवी. झाडांबद्दल सगळं काही जाणून घ्यायचं असेल तर www.treetures.com या साईटला भेट द्या. या साईटवर झाडांशी संबंधित सगळी माहिती उपलब्ध आहे. या साईटचं होमपेज खूप आकर्षक आहे. या होमपेजवर तुम्हाला वेगवेगळी पात्रं दिसतील. त्यावर क्लिक केलं की झाडाच्या प्रत्येक भागाची माहिती मिळू शकेल. या साईटवर रंजक माहितीही आहे. झाडांबद्दलचं ज्ञान वाढवण्यासाठी ही साईट उपयुक्त ठरू शकेल.

झाडं कशी लावायची, त्यांचं संवर्धन कसं करायचं हे सगळं या साईटवर आहे. रंग बदलणारी पानं, जंगलांची रचना, वणवा कसा लागतो, झाडं कशी वाढतात, झाडांना कीड कशी लागते हे सगळं यावर आहे. इथे झाडांविषयीचं ज्ञान वाढवणारे गेम्स आहेत. छान छान व्हिडिओ आहेत. चांगल्या आणि वाईट कीटकांची वर्गवारी करण्यात आली आहे.

काही कीटक झाडांच्या वाढीला मदत करतात. झाडांचं नुकसान करणारे किडे खातात तर काही कीटक पानं खातात. झाडांची वाढ रोखतात. इथे तुम्ही अशा कीटकांची माहिती मिळवू शकता. मग काय दोस्तांनो, झाडांना वाहिलेल्या या साईटला भेट देणार ना?






## कसं मिळवायचं मानांकन?

स्मार्ट नॉलेज

'गुगल' हे जगातलं सर्वोत्तम सर्च इंजिन आहे. इथे एखादी माहिती, बातमी किंवा साईट सर्च करायची असेल तर सर्चबारमध्ये जावं लागतं. या सर्चबारमध्ये तुम्हाला विविध कंपन्या, वेबसाईट्स तसंच बातम्या दिसतात. हे सगळं गुगलच्या पहिल्या पानावर असतं. गुगलच्या पहिल्या पानावर स्थान मिळवण्यासाठी कंपन्या, वेबसाईट्समध्ये चढाओढ असते. कोणत्या साईटला पहिल्या पानावर स्थान द्यायचं हे गुगल ठरवतं. हे ठरवण्याची गुगलची एक पद्धत आहे. गुगल प्रत्येक साईटला मानांकन म्हणजे रँक देतं. या प्रक्रियेला 'अल्गोरिदम' असं म्हटलं जातं. ही प्रक्रिया नेमकी काय आहे याविषयी...

कसं मिळतं मानांकन?

सर्वाधिक वाचल्या गेलेल्या किंवा सर्च केल्या गेलेल्या वेबसाईट्स, बातम्या, कंपन्या तसंच इतर बाबींना गुगल पहिल्या पानावर स्थान देतं. कोणती बातमी किंवा साईट किती शेअर केली आहे हे सुद्धा गुगल बघतं.

क्लिक

वेबसाईट किंवा माहितीवर करण्यात आलेल्या क्लिकच्या आधारे मानांकन ठरतं. क्लिक जास्त तेवढं मानांकन वर येण्याची शक्यताही जास्त. एखाद्या साईटला मिळणारे क्लिक कमी झाले तर ती साईट दुसऱ्या किंवा तिसऱ्या पानावर जाते.

बाउंस रेट

साईटचा बाउंस रेट जास्त असेल तर मानांकन खाली घसरू शकतं. लोकांना साईटवरची माहिती आवडली नाही तर बाउंस रेट वाढतो.

सरासरी वेळ

युजरने वेबसाईटवर किती वेळ घालवला किंवा एखादी माहिती किती वेळ वाचली यावरुन गुगल मानांकन ठरवतं.

कुठून मिळाली माहिती?

एखाद्या साईटची किंवा वृत्ताची माहिती कुठून मिळाली हे सुद्धा पाहिलं जातं. सोशल मीडिया किंवा थेट गुगलवरून माहिती मिळाली असेल तर नामांकन वर येतं. अन्य मार्गाने माहिती मिळाली असेल तर नामांकन घसरतं.




## निवडा वेगळी वाट

कोण होणार?


डॉक्टर, इंजिनिअर, सीए, एमबीए, आयसीडब्ल्यूए यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसोबत आता करीअरचे हटके पर्याय निवडण्याचा ट्रेंड आहे. विविध क्षेत्रात उत्तम संधी निर्माण झाल्या आहेत. करीअरची वेगळी वाट निवडणाऱ्यांचं कौतुकही होतं. तुम्हीही करीअरची वेगळी वाट निवडू शकता. वेगळ्या करीअरचे हे काही पर्याय...

* इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कार्पेट टेक्नॉलॉजीमधून तुम्ही कार्पेट टेक्नॉलॉजीचा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही कापड उद्योगात करीअर करू शकता.

* ट्रेकिंग हा धाडसी क्रीडाप्रकार असल्यामुळे त्याचं प्रशिक्षण घ्यावं लागतं. माउंटेनियरिंग किंवा ट्रेकिंग प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही या क्षेत्रात करीअर करू शकता.

* मुंबई विद्यापीठासह काही संस्था पपेटरीचं प्रशिक्षण देतात. हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही करीअरची वेगळी वाट निवडू शकता.

* इंडियन अॅस्ट्रोबायोलॉजी संशोधन संस्थेत अॅस्ट्रोबायोलॉजीचा अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तुम्ही अंतराळ क्षेत्रात संशोधन करू शकता.



# वडील आणि मुलीचा भीषण अपघातात मृत्यू

## बारावीच्या पेपरसाठी जात असताना घडली घटना

### एक युवती गंभीर जखमी

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२ :**



नागपूर जिल्ह्यातील उमरेड पोलीस स्टेशन हद्दीतील मोहपा गावाजवळ गुरुवारी गिट्टीने भरलेल्या ट्रक आणि दुचाकीमध्ये भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दुचाकीवरील वडील आणि मुलीचा जागीच मृत्यू झाला, तर एक युवती गंभीर जखमी झाली आहे.

मृतकांमध्ये सुभाष केशव भिवणकर (वय ५०) आणि त्यांची मुलगी जान्हवी सुभाष भिवणकर (वय १८) यांचा समावेश आहे. दोघेही मोहपा येथील रहिवासी होते. वंशिका ज्ञानेश्वर नरुले (वय १८) ही गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ती देखील मोहपा येथीलच रहिवासी आहे.

माहितीनुसार, सुभाष भिवणकर हे त्यांची मुलगी जान्हवी आणि वंशिका यांना बारावीच्या परीक्षेसाठी उमरेडमार्गे घेऊन जात होते. जान्हवी आणि वंशिका यांचा गुरुवारी बारावीचा पेपर होता. मोहपा गावाबाहेर जात असताना हा अपघात घडला. गिट्टीने भरलेल्या एम. एच. ४०, बीजी ७७५० क्रमांकाच्या ट्रकसोबत दुचाकीची जोरदार धडक झाली. अपघात इतका भीषण होता की, सुभाष भिवणकर आणि जान्हवी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघातानंतर ट्रकचालकाने वाहनासह पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र स्थानिक नागरिकांनी त्याला पकडून गावात आणले. संतप्त जमावाने चालकाला मारहाण केली आणि ट्रकची केबिन पेटवून दिली.

माहिती मिळताच नागपूर जिल्हा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. नागपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी घटनास्थळी भेट दिली. आरसीबी पथक आणि इतर पोलीस दल तैनात करीत जमावाची समजूत काढून त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

# ट्रकच्या धडकेत बारावीचा विद्यार्थी ठार

■ **महासागर प्रतिनिधी**
**बुलढाणा, दि. १२ :**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात निर्णायक ठरणाऱ्या बारावीचा पेपर देण्यासाठी दुचाकीने जाणाऱ्या विद्यार्थ्याचा अपघातात मृत्यू झाला. चिखली तालुक्यातील मालगणी फाटा येथे गुरुवारी, १२ फेब्रुवारी रोजी ही दुर्दैवी घटना घडली. शंतनू नारायण अंभोरे (वय २१) रा. एकलारा, तालुका चिखली, जि. बुलढाणा,असे मृत परीक्षार्थीचे नाव आहे.

बुलढाणा येथील परीक्षा केंद्रावर असलेल्या बारावीच्या परीक्षेसाठी तो दुचाकीने निघाला होता. दरम्यान भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिली. अपघातानंतर वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. घटनास्थळी ग्रामस्थांचा मोठा जमाव जमला. नागरिक प्रक्षुब्ध झाल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. चिखली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मालगणी फाटा परिसरातील वाहतूक सुरळीत केली.

संतप्त नागरिकांची समजूत घालून त्यांना शांत केले. अज्ञात चालकविरुद्ध कारवाईचे आश्वासन दिले . यामुळे घटना स्थळी निर्माण झालेला तणाव निवळला.

दरम्यान मालगणी फाटा परिसरात नियमित अंतराने होणाऱ्या अपघातांमुळे हा रस्ता मृत्यूचा सापळा ठरत असल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे. सायंकाळपर्यंत लोकांचा संताप कायम होता.

# स्वायत्त पशुवैद्यकीय परिषद स्थापन करण्याची गरज

## मोहन भागवत यांची मागणी







■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर , दि. १२ :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी पशुवैद्यकीय शास्त्रासाठी स्वायत्त आणि स्वतंत्र परिषदेची स्थापना करण्याची मागणी केली आहे. 'ज्याचे काम त्यानेच केलेले चांगले असते,' असे प्रतिपादन त्यांनी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

भागवत यांच्या मते, ज्याप्रमाणे क्रीडा क्षेत्रात खेळाडूंची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे प्राणी विज्ञानाची गुंतागुंत समजून घेण्यासाठी संबंधित ज्ञान असलेल्या लोकांची गरज असते. केवळ तज्ज्ञांनाच या क्षेत्रात निर्णय घेण्याचा अधिकार असावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

एखादे विशिष्ट काम तज्ज्ञ व्यक्तीकडे सोपवल्यास ते अधिक प्रभावीपणे होते, अन्यथा काम बिघडू शकते. प्राण्यांचे सखोल आकलन होण्यासाठी पशुवैद्य आणि पशुवैद्यकीय शास्त्राची आवश्यकता असते.

आपण स्वतः पशुवैद्य असल्याने ही मागणी करत नसून, योग्य आणि तज्ज्ञ व्यक्तींच्या हाती काम असलेली क्षेत्रे वेगाने प्रगती करतात, असा आपला अनुभव असल्याचे भागवत यांनी सांगितले.

पशुवैद्यकीय क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि विशिष्ट धोरणे तयार करण्यासाठी एक समर्पित परिषद स्थापन करणे ही काळाची गरज आहे. या मागणीद्वारे त्यांनी पशु आरोग्य आणि व्यवस्थापन संरचना अधिक प्रभावी व व्यावसायिक करण्यावर भर दिला.

# विसासंघाच्या निवडणुकीत 'वर्धेकर' भिडले

■ **महासागर प्रतिनिधी**
**वर्धा / मुंबई, दि. १२ :**

विदर्भाच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक असलेल्या 'विदर्भ साहित्य संघा'ची निवडणूक यंदा रणधुमाळीत रूपांतरित झाली असून, या सत्तासंघर्षाचे केंद्र आता 'वर्धा' जिल्हा ठरताना दिसत आहे. या निवडणुकीत महत्त्वाच्या पदांवर आणि प्रचाराच्या धुरेत वर्धेकरच अग्रभागी आहेत, पण ते एकमेकांच्या विरोधात शड्डू ठोकून उभे ठाकल्याने साहित्याच्या आखाड्यात मोठी चुरस निर्माण झाली आहे. आता 'साहित्यिक विरुद्ध असाहित्यिक' असा थेट सामना या निवडणुकीत दिसत आहे.

विद्यमान अध्यक्ष प्रदीप दाते हे स्वतः वर्धेकर असून त्यांच्या नेतृत्वाखालील पॅनल पुन्हा एकदा मैदानात आहे. वर्ध्यात पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे यशस्वी नियोजन दाते यांच्या काळातच झाले होते. मात्र, आश्चर्याची बाब म्हणजे दाते यांचेच एकेकाळचे जवळचे स्नेही आणि प्रसिद्ध कवी संजय इंगळे तिगावकर यांनीच त्यांच्या विरोधात आघाडी उघडली आहे.

संस्था स्वयंकेंद्री लोकांच्या हातात गेली असून ती साहित्यिकांच्याच ताब्यात असायला हवी, असा आक्रमक पवित्रा तिगावकर यांनी घेतला आहे. डॉ. श्रीपाद जोशी पॅनलची संपूर्ण धुरा सांभाळत त्यांनी दाते यांच्या 'वर्धा पॅटर्न'वरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

दुसरीकडे, प्रा. राजेंद्र मुंढे हे दाते यांच्या समर्थनासाठी प्रचाराचे रणांगण गाजवत आहेत, तर मूळच्या वर्धेकर असलेल्या प्रसिद्ध लेखिका अरुणा सबाने यांनी गिरीश गांधी यांच्या पॅनलमधून उमेदवारी अर्ज भरला आहे.

संस्थेत प्रशासनाचा अभाव असून इमारतीचा प्रश्न गंभीर आहे, असे सांगत सबाने यांनी वर्धेकर मतदारांच्या स्नेहावर विश्वास व्यक्त केला आहे. याशिवाय, वर्ध्यात प्रदीर्घ काळ अधिकारी राहिलेले अनिल गडेकर हे देखील दाते यांच्या पॅनलकडून नशीब आजमावत आहेत.

अध्यक्षपदाचे उमेदवार प्रदीप दाते यांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. मी सर्व विचारप्रवाहांना सोबत घेऊन संस्थेची प्रतिष्ठा जपली आहे, त्यामुळे मतदार पुन्हा एकदा माझ्या कामालाच पसंती देतील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वर्ध्याच्या भूमीतील या दिग्गज साहित्यिकांच्या परस्पर विरोधामुळे विदर्भ साहित्य संघाच्या गादीवर नक्की कोण बसणार आणि वर्धेकर मतदार कुणाच्या पारड्यात आपले माप टाकणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# विमान दुर्घटनेची पारदर्शक चौकशी करा

## आमदार नाना पटोलेंची राज्य सरकारकडे मागणी

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२ :**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेमुळे जनतेच्या मनात संशय निर्माण झाला आहे. या घटनेमागील सत्य त्वरित समोर यावे आणि राज्य सरकारने याबाबत स्पष्ट खुलासा करावा, अशी मागणी काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केली आहे. ते नागपूर येथे माध्यमांशी बोलत होते.

पटोले म्हणाले की, केवळ चौकशीचे आश्वासन पुरेसे नाही. ही चौकशी पारदर्शक, निष्पक्ष आणि कालबद्ध असावी. चौकशीला होणारा विलंब स्वतःच संशय निर्माण करणारा आहे. गुजरातमधील विमान दुर्घटनेचा अहवाल अद्याप आलेला नाही, त्यामुळे अशी दिरंगाई म्हणजे सत्य दडपण्याचा प्रयत्न आहे का, असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण होत आहे.

**प्रत्येकाची चौकशी व्हावी**

पटोले म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहित पवार यांनी पायलट आणि विमानाची स्थिती याबाबत उपस्थित केलेले मुद्दे अत्यंत गंभीर आहेत. या सर्व मुद्द्यांची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे. कोणाचेही नाव किंवा पद मोठे असले तरी, चौकशीच्या कक्षेबाहेर कोणीही राहू नये, असे पटोले यांनी स्पष्ट केले.

**गोंदियातील राईस मिलचा उल्लेख**

पटोले यांनी माध्यमांमधून मिळालेल्या माहितीचा उल्लेख केला. त्यानुसार, पूर्व विदर्भातील एका नेत्याने अजित पवारांच्या फाईलवर सही करण्यासाठी वेळ लावल्याने त्यांना विमानाने प्रवास करावा लागला. गोंदियातील राईस मिल संदभार्तील एका फाईलमुळे त्यांना तातडीने विमान प्रवास करावा लागल्याचेही सांगितले जात आहे.

गोंदिया जिल्ह्यातील राईस मिल संदभार्तील ती फाईल असल्याने स्थानिक राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्याकडे संशयाची सुई जात असल्याचे पटोले म्हणाले. मात्र, या सर्व बाबींचे खरे सत्य केवळ अधिकृत आणि निष्पक्ष चौकशीतूनच समोर येऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.

**नैतिक भूमिका घेतली जात नाही**

पटोले यांनी एपस्टीन फाईल्सचाही उल्लेख करत, अनेक लोकशाही देशांमध्ये केवळ नाव आल्यावरही नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामे दिले जातात, मात्र भारतात सत्ताधाऱ्यांकडून नैतिक भूमिका घेतली जात नाही, अशी खंत व्यक्त केली. लोकशाहीचा विश्वास टिकवण्यासाठी सत्य समोर आणणे आणि जबाबदारांवर कारवाई करणे अनिवार्य असल्याचे नाना पटोले यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले.

# तू या मैं चा म्युझिक लॉन्च सोहळा ठरला शानदार





**लोकरंजन**

रोमँटिक जी लियापासून फेम असच्या जोरदार एनर्जीपर्यंत आणि नाम करू बडा च्या रॉ बीट्सपर्यंत, तू या मैंचा अल्बम प्रेमाला रॅप आणि हिप-हॉपसोबत प्रभावीपणे जोडतो.

हा अल्बम बोल्ड, फ्रेश आणि प्रेक्षकांना सहज जोडणारा साउंडस्केप तयार करतो. चित्रपटाच्या रिलीजच्या काही दिवस आधीच मेकर्सनी नॉस्टॅल्जिक पण कंटेम्पररी आंखें चार हे गाणं रिलीज केलं, ज्याने क्षणातच तरुणाईच्या मनाला स्पर्श केला आणि संपूर्ण वातावरण व्हाइबमध्ये बदलून टाकलं.

तू या मैं च्या संगीताचं भव्य आणि पॉवर-पॅक्ड लॉन्च करण्यात आलं, जे एक अविस्मरणीय ठरल. या कार्यक्रमाला शनाया कपूर, आदर्श गौरव, दिग्दर्शक बेजॉय नांबियार, निर्माते आनंद एल राय आणि हिमांशु शर्मा यांच्यासह ७ बंटाइ आणि संपूर्ण टीम उपस्थित होती. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह आणि जबरदस्त एनर्जी पाहायला मिळाली. आदर्श गौरवने नाम करू बडा वर दमदार परफॉर्मन्स देत स्टेज गाजवला, तर जी लियाने प्रेक्षकांच्या मनाला भिडलं. शनाया कपूर, आदर्श गौरव, परुल गुलाटी आणि अंशसह संपूर्ण स्टारकास्टने ७ बंटाइ सोबत फेम असवर भन्नाट परफॉर्मन्स सादर केला, ज्यामुळे संपूर्ण हॉल थिरकायला लागला.

बेजॉय नांबियार दिग्दर्शित तू या मैं या चित्रपटाची निर्मिती कलर यलो बॅनरखाली आनंद एल राय आणि हिमांशु शर्मा यांनी केली आहे. हा चित्रपट तू या मैं १३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

■ ■ ■





## व्हर्च्युअल स्टुडिओमध्ये चित्रित केलेला भारतातील पहिला म्युझिक व्हिडिओ 'शरमणा

गायक, संगीतकार आणि दिग्दर्शक रामजी गुलाटी यांनी त्यांचा नवीनतम एकल शरमणा रिलीज केला आहे, जो आता सर्व प्रमुख डिजिटल प्लॅटफॉर्मवर स्ट्रीमिंग होत आहे. के सेरा सेरा सादर करत असलेले हे गाणे भारतीय संगीत निर्मितीतील एक महत्त्वाचा क्षण आहे कारण एआय इंटिग्रेशनसह पूर्णपणे व्हर्च्युअल स्टुडिओ वातावरणात तयार केलेला हा पहिला म्युझिक व्हिडिओ आहे, जो व्हिज्युअल स्टोरीटेलिंगसाठी एक नवीन बेंचमार्क स्थापित करतो.

शरमणा पारंपारिक संगीत व्हिडिओंच्या सीमा ओलांडून दृश्यात्मकदृष्ट्या तल्लीन करणारा अनुभव देण्यासाठी समकालीन भारतीय पॉपला व्हर्च्युअल प्रोडक्शन तंत्रज्ञानाशी जोडते. डिजिटली तयार केलेल्या वातावरणाचा आणि नियंत्रित व्हर्च्युअल सेट्सचा वापर करून, हा प्रकल्प मुख्य प्रवाहातील मनोरंजनात तंत्रज्ञानावर आधारित सर्जनशीलतेकडे वाढत असलेल्या बदलाचे प्रतिबिंबित करतो.

या म्युझिक व्हिडिओमध्ये अभिनेता रोहन मेहरासोबत नवोदित अभिनेत्री हिया आहे, ज्यामध्ये बिग लव्हचे रॅप व्होकल्स आणि कुंवर जुनेजा यांनी लिहिलेले गीत आहे. एकत्रितपणे, सहयोगी कामगिरी, फॅशन आणि शैलीबद्ध व्हर्च्युअल व्हिज्युअल्स एकत्र आणून एक आकर्षक ऑन-स्क्रीन कथा तयार करतात.

■ ■ ■

झी स्टुडिओजच्या सुपर डुपरचा टीझर प्रदर्शित!

सर्वच स्तरांतील, वयोगटातील आणि विविध भागांतील प्रेक्षकांना आवडेल, रुचेल आणि मनापासून भावेल अशीच गोष्ट असणारा ' सुपर डुपर ' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. झी स्टुडिओजची प्रस्तुती, नाईंटी नाईन प्रॉडक्शन्स तथा सिद्धिविनायक प्रॉडक्शन्सची निर्मिती आणि समीर आशा पाटील यांचे दिग्दर्शन असलेल्या 'सुपर डुपर' या चित्रपटाचा धमाकेदार टीझर नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित झाला आहे. निर्मिती सावंत, शशांक शेंडे, हृषिकेश जोशी, नम्रता संभेराव, कुशल बद्रिके, प्रतीक्षा कोते आणि मुख्य नायक नायिकेच्या भूमिकेत असलेले ललित प्रभाकर आणि विदुला चौगुले अशी स्टारकास्ट यामध्ये झळकणार आहे. कौटुंबिक महासोहळा अशी टॅगलाईन असलेला हा चित्रपट येत्या ३ एप्रिलला प्रदर्शित होणार असून टीझरमुळे प्रेक्षकांची उत्सकुता वाढली आहे. या चित्रपटाचे विजय शिंदे आणि नरेश बोर्डे निर्माते आहेत. तर उमेश कुमार बन्सल, बवेश जानवलेकर प्रस्तुतकर्ता आहेत. ■ ■









'सन मराठी' वाहिनीवरील 'जुळली गाठ गं' या मालिकेत सध्या मोठा ट्विस्ट पाहायला मिळत आहे. मालिकेत सावी व धैर्य या दोघांना वेगळं करण्यासाठी दामिनी सातत्याने कट रचत आहे. काही दिवसांपूर्वी सावीच्या आयुष्यात अंगद हा व्यक्ती आला. भाऊंचा विद्यार्थी असल्याचा बनाव करत स्वतःच्या बिझनेस साठी त्याने सावीकडे मदत मागितली. मदतीसाठी होकार देऊन सावी नकळत या प्रकरणात अडकते.

सावीवर अंगदला आत्महत्येसाठी प्रवृत्त करण्याचा आणि अंगदचा विनयभंग केल्याचा आरोप लावून अटक करण्यात येते. या प्रकरणातून निर्दोष सुटण्यासाठी सावी ही लढाई लढत आहे. या लढाईत सावीच्या मदतीसाठी 'सन मराठी' वरील सदस्य एकत्र येणार आहेत. इन्स्पेक्टर मंजू सुरुवातीपासूनच सावीच्या मदतीसाठी धावून आली आहे. तर कायद्याच्या कचाट्यातून सोडवायला राणी देखील सावी सोबत उभी आहे. अर्पिता, अनुप्रिया, आणि वैदही यांचीही साथ सावीला मिळणार आहे. 'अंतिम निकालाचा टप्पा' १६ फेब्रुवारी दुपारी १ आणि सायं. ७ वा. सन मराठीवर पाहता येईल. ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# उपराजधानीत ५.६२ लाख स्मार्ट प्रीपेड मीटर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :**

स्मार्ट प्रीपेड मीटरचे नाव बदलून टीओडी मीटर (टाइम ऑफ डे)करून ग्राहकांकडे लावणे सुरू आहे. या मीटरला अनेक संघटनांसह ग्राहकांचाही विरोध कायम आहे. त्यानंतरही नागपुरात मोठ्या संख्येने हे मीटर . नागपूर परिमंडळात ५.६२ लाख ग्राहकांकडे हे मीटर लावले असून त्यांना अचूक देयकासोबत वीजदरात सवलत मिळत असल्याचा महावितरणचा दावा आहे.



स्मार्ट टीओडी मीटर डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित आहेत. या मीटरमुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय अचूक रीडिंग थेट मुख्यालयात नोंदवले जाणार आहे. त्यामुळे सरासरी किंवा अंदाजे बिलांचा त्रास आता कायमचा संपुष्टात येईल. हे मीटर पोस्टपेड असून सध्याच्या मासिक पद्धतीप्रमाणेच ग्राहकांना बिल भरायचे आहे.

मीटरसाठी महावितरणने कोणतेही कर्ज काढलेले नसून केंद्र सरकारच्या अनुदानातून हा प्रकल्प राबवला जात आहे. त्यामुळे ग्राहकांकडून यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क किंवा अनामत रक्कम आकारली जात नाही.

जुने मीटर बदलणे ही एक नियमित प्रक्रिया असून त्यासाठी ग्राहकांना कोणत्याही अफवांना बळी पडू नये, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे. १ जुलै २०२५ पासून लागू झालेल्या ऐतिहासिक निर्णयानुसार, सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रति युनिट ८० पैसे ते १ रुपयापर्यंत सवलत मिळत आहे.

उदाहरणार्थ, एखाद्या ग्राहकाचा मासिक वापर १०० युनिट असेल आणि तो दिवसा वीज वापरत असेल, तर ८७५ रुपयांचे देयक आता सवलतीमुळे ७८४ रुपयांपर्यंत खाली येऊ शकते. महावितरणच्या खास ॲपवर ग्राहकांना आपल्या तासागणिक वापराची माहिती मिळणार असल्याने वीज वापरावर नियंत्रण ठेवणे सोपे झाले आहे.

आतापर्यंत नागपूर परिमंडळाअंतर्गत असलेल्या नागपूर शहर मंडळात ३ लाख १ हजार ३१३, नागपूर ग्रामीण मध्ये १ लाख ५२ हजार ५७१, तर वर्धा मंडळात १ लाख ८ हजार ३०२ मीटर बसवण्यात आले आहेत.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प लावणाऱ्या ग्राहकांसाठी हे मीटर अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत, कारण यात नेट मीटरिंगची सुविधाही अंतर्भूत आहे.

# धर्मभास्कर सद्गुरुदास महाराज पंचत्वात विलीन

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२ :**



शिवकथाकार, आध्यात्मिक गुरु आणि संपूर्ण विदर्भातील गोरगरिब जनतेला आध्यात्मिक वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देणारे धर्मभास्कर सद्गुरुदास महाराज यांनी बुधवारी सायंकाळी अखेरचा श्वास घेतला. बुधवारी रात्री उशीरापर्यंत भाविकांनी अंत्यदर्शनार्थ श्री गुरुमंदिरात गर्दी केली.

गुरुवारी सकाळपासून भाविकांची अंत्यदर्शनार्थ रिघ लागली होती. त्यात राष्ट्रसेविका समितीच्या चित्राताई जोशी, रा. स्व. संघाचे प्रचारक रवींद्र भुसारी, श्याम पत्तरकिने, डॉ. विलास डांगरे, ज्येष्ठ संपादक लक्ष्मणराव जोशी, माजी कुलगुरु डॉ. पंकज चांदे, कल्याणी देशमुख, छत्रपती सेवा प्रतिष्ठानचे अनंत महाजन, हनुमंत महाजन, रा. स्व. संघाचे विदर्भ प्रांत प्रचारक ऋषीकेश तावडे, राजे मुधोजी भोसले, ज्येष्ठ निरुपणकार डॉ. स्वानंद पुंड, श्रीराम महाराज जोशी यांनी अंत्यदर्शन घेतले. दुपारी उपस्थित हजारो भाविकांनी सामूहिक प्रार्थना व उपासना केली.

महाराजांचे पार्थिव मंदिरातून तळमजल्यावर मंत्राग्नीच्या विधीसाठी आणण्यात आले, त्यावेळी उपस्थित हजारो भाविकांनी गर्दी केली. मंदिरापासून अंत्ययात्रा प्रारंभ झाली, त्यावेळी संपूर्ण मार्गावर महिला, पुरुष भाविक दुतर्फा उभे होते, प्रत्येकाच्या डोळ्यात आसवं होती आणि हाताने फुलांचा वर्षाव सुरु होता. घाटावर धार्मिक विधी झाल्यानंतर पुत्र अजेय देशमुख यांनी अग्नी दिला. त्यावेळी उपस्थितांना दुःखाचा आवेग आवरणे कठिण होत होते.

अंत्यसंस्कारानंतर झालेल्या शोकसभेत रा. स्व संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या संदेशाचे वाचन करण्यात आले. सद्गुरुंना सहकारनगर घाटावर अखेरचा निरोप दिला.

त्यानंतर डॉ. स्वानंद पुंड, दुर्ग प्रतिठानचे अतुल गुरु, राज्याभिषेक सोहळा समितीचे दत्ता शिर्के, भाजपा तर्फे संजय बंगाले, श्री गुरुमंदिर परिवारातर्फे अरुण कडबे, गीता परिवार तर्फे श्रीनिवास वर्णेकर, रा. स्व. संघातर्फे श्रीकांत चितळे, रवींद्र बोकारे, नागपूरचे माहिती आयुक्त गजानन निमदेव, महाराष्ट्र टाईम्सचे संपादक श्रीपाद अपराजित, सकाळचे संपादक प्रमोद काळबांडे, जनआक्रोशचे रवींद्र कासखेडीकर, वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, डॉ. पिनाक दंदे, नाना महाराज तराणेकर परिवारातर्फे सजय पाठक, शिवप्रतिष्ठान तर्फे प्रसाद काळे, प्रल्हाद महाराज उपासना मंडळातर्फे नितीन कुळकर्णी, पराग जोशी व अनिल दामोडे, उत्कर्ष मंडळातर्फे अतुल मोहरील श्रद्धांजली व्यक्त केली. शांतिमंत्राने सभेची सांगता झाली.

पान १ वरून...

## स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून...

यांनीही शासनासोबत जलसंधारण क्षेत्रात काम करण्यास मदत मिळत असल्याबाबत समाधान व्यक्त केले. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव (आरोग्य) डॉ. निपुण विनायक, सचिव (महिला व बालविकास) अनुपकुमार यादव, टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा, नाम फाउंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, टाटा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धार्थ शर्मा आदींसह टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

सामंजस्य करार तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी' याद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना पाठबळ देणे, समुदायांपर्यंत प्रमुख कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, नागपूर येथील सहा मान्यताप्राप्त रुग्णालयांसोबत केलेल्या करारांद्वारे, गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य देणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत गंभीर आजारांमध्ये सुलभ व कमी खर्चाचे उपचार उपलब्ध करून देणे आहे.

**सामंजस्य करारांची व्याप्ती**

माता, नवजात बालक, बालक आणि किशोरवयीन मुलांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे; टेलिमेडिसिनसह इतर माध्यमांतून उपचार सहज देणे, शहरी आणि दुर्गम भागातील सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा वाढवणे, एकात्मिक आपत्कालीन व्यवस्थापन सेवाद्वारे उत्तम आपत्कालीन प्रतिसादास पाठबळ देणे. दोन वर्षांखालील मुलांमधील खुंटलेली वाढ, कमी वजन आणि कुपोषण रोखण्यास मदत करणे, किशोरवयीन कुपोषण आणि रक्तक्षय दूर करणे, गडचिरोली सारख्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून 'टेक-होम रेशन' सारख्या योजनांचे वितरण मजबूत करणे, तलावांचे पुनरुज्जीवन, जलकुंभ आणि नद्यांमधील गाळ काढणे, भूजल पुनर्भरण सुधारणे, मराठवाडा आणि विदर्भासह पाणीटंचाईग्रस्त भागांवर विशेष भर देऊन मृद व जलसंधारण योजनांची अंमलबजावणी करणे, शेतीला प्रोत्साहन देणे, शेती उपजीविकेला पाठबळ देणे, आरोग्य, शिक्षण, पोषण, पाणी, स्वच्छता आणि उपजीविका या सर्वांना एकत्र आणणारा एकात्मिक ग्राम विकास साधणे हा आहे.